# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २२/०७/२०१५**

आज बुधवार दि. २२/०७/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी १०.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. १६/०७/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ५) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ६) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ७) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| ८) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| ९) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १०) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| ११) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १२) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १३) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १४) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १५) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| १६) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| १७) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| १८) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| १९) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २०) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २२) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २३) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २४) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| २५) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| २६) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २७) | शरद केशव पाटील | सदस्य |
| २८) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| २९) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३०) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३१) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३२) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३३) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३४) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ३६) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३७) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ३८) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ३९) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४०) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४१) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४२) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४३) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४४) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४५) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४६) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४७) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | सदस्या |
| ४८) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४९) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५०) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५१) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५२) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५३) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५४) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५५) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५६) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ५७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५९) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६०) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६१) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६२) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६३) | दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| ६४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६५) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६६) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६७) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६८) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७१) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७२) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७४) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७५) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७७) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७८) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७९) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८०) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८१) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८२) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८५) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | हेमंत सदानंद म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| २) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ३) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ४) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ५) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| ७) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ८) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ९) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| १०) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभा सुरु करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. २२/०७/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५, दि. १६/०७/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६१, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत येणाऱ्या स्वच्छता अभियान महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविणेबाबत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मा. पंतप्रधान महोदयांनी स्वच्छ भारत अभियान २/१०/२०१४ ते २/१०/२०१९ पर्यंत राबविण्याचे घोषित केलेले आहे. त्याच्यामध्ये काही ठळक मुद्दे आहेत. मुद्दे गोषवारेत नमुद केलेले आहे ते तुम्हाला वाचुन दाखवितो. स्वच्छ भारत अभियानामध्ये साधारण सुस्वच्छ घर, घराशेजारचा परिसर स्वच्छ ठेवणे हा एक मुद्दा आहे. सार्वजनिक शौचालये दुरुस्ती करणे, देखभाल दुरुस्ती करणे, शौचालय दुरुस्त ठेवणे हा एक त्याच्यामध्ये मुद्दा आहे हुतात्माची पुतळ्याची साफसफाई ठेवणे पिरिओडीकली साफसफाई ठेवणे हा एक मुद्दा आहे सार्वजनिक जागेची स्वच्छता करणे व कचरा उचलणे हा एक मुद्दा आहे. सार्वजनिक जागेची स्वच्छता करणे व कचरा उचलणे हा एक मुद्दा आहे. शासकीय इमारती मधील अनावश्यक फर्निचर दस्ताऐवज यांची विल्हेवाट लावणे जनजागृती करणे, एन.जी.ओ मार्फत, विद्यार्थी मार्फत निवृत्त अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत त्यानुसार महानगरपालिकेने काय काय कारवाई केली त्यामध्ये गोषवाऱ्यामध्ये नमुद केले आहे महानगरपालिकेने सुध्दा स्वच्छ अभियानमध्ये शपथ घेतलेली आहे. शपथ घेऊन सुध्दा २ ऑक्टोबर २०१४ रोजी मेन रस्ते काही झाडलेले आहेत पुतळ्याची स्वच्छता ठेवलेली आहे. सार्वजनिक ठिकाणे आहेत त्या ठिकाणी कचरा उचललेला आहे आणि कचरा उचलून मोठ्या प्रमाणात जनजागृती सुध्दा केली आहे. प्लास्टिकच्या पिशव्या जवळपास ५००-६०० किलो प्लास्टिक जप्त केले आहे. सार्वजनिक शौचालयेमध्ये जवळपास १७० सार्वजनिक शौचालये आहेत. त्या शौचालयामध्ये प्रत्येक अधिकाऱ्याला त्याला पालकत्व देऊन त्याची पिरॅडीकल इन्सपेक्शन करणार, साफसफाई ठेवणे, साफसफाईमध्ये त्यात पाणी आहे की नाही, फर्निचर बरोबर आहे की नाही, लाईटची व्यवस्था आहे की नाही त्याचा अहवाल तयार केला. अहवाल तयार करुन आम्ही ती सार्वजनिक शौचालये बांधकामामार्फत ते बांधून ते चांगल्या कंडीशनमध्ये कसे राहतील आणि पिरॅडीकल त्याची साफसफाई कशी होईल ते सुध्दा आम्ही बघत आहोत तसेच सार्वजनिक ठिकाणे जे आहेत बस स्टॅन्ड असो, एस.टी.स्टॅन्ड असो. त्याठिकाणी सुध्दा आम्ही साफसफाई करुन घेतलेली आहे. साधारणतः ७० ठिकाणी मोकळी भुखंड होती त्या भुखंडाची सुध्दा आम्ही साफसफाई करुन घेतलेली आहे. कधी-कधी ३-३, ४-४ महिन्यांनी सार्वजनिक भुखंडे आहेत त्याची आम्ही साफसफाई करणार आहोत तसेच महाराष्ट्र शासनाने सुध्दा सप्तपदी स्वच्छतेची एक शपथ त्यांनी घेतली आहे. त्याच्यामध्ये सुध्दा सात मुद्दे आहेत त्याच्याबद्दल महाराष्ट्र शासनाने एक परिपत्रक काढून त्याच्यामध्ये शपथ घेऊन त्या पध्दतीने एक धोरण आखलेले आहे त्या सप्तपदीमध्ये काय काय उल्लेख होतो त्याची तुम्हाला माहिती सांगतो त्याच्यामध्ये माझा पहिल्यापासुन सहभाग आहे तो ठाम निर्धाराने दुसरे पाऊल व्यापक लोक सहभाग मिळवणे तिसरे पाऊल १०० टक्के शौचालयाचा वापर करणेस लोकांना प्रवृत्त करणे. चौथे पाऊल कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण वाहतुक करणे आणि पाचवे पाऊल कचऱ्यावर प्रस्तृत प्रकरणी प्रक्रिया करणे सहावे पाऊल सांडपाण्यावर प्रक्रिया करणे. सातवे पाऊल हरित स्वच्छ महाराष्ट्र साकारणे अशी साधारणतः सप्तपदी मा. मुख्यमंत्री महोदयांनी शपथ घेतली आहे त्यांचा नमुना सुध्दा मी तुम्हाला दिलेला आहे आणि सर्वांनी शपथ घ्यावयाची आहे. सर्व सभागृहाला मी विनंती करतो की मा. पंतप्रधान महोदयांनी शपथेचा नमुना सादर केलेला आहे. तरी तो शपथेचा नमुना आम्ही सर्वांना देतो तरी उभे राहून दोन मिनिटे आपण सर्वांनी ती शपथ घ्यावयाची आहे आणि सर्वांच्या सहभागाने आपल्याला हे मिरा भाईंदर स्वच्छ शहर आपल्याला करायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब आयुक्त महोदय आपण इथे आज जी शपथ घेणार तिथे १०० फुट रस्त्यावर मिरारोड इथे डम्पर उभे आहेत. तुमचे कचरा कचरा जात नाही कुठे वाहतूक होत नाही. शपथ फक्त आमच्यासाठी का प्रशासनासाठी नाही. शपथ फक्त आम्हीच घ्यायची काय?

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, नगरसेवकांनी शपथ घेवून काही होणार नाही अधिका-यांनी घेतली पाहिजे.

**वर्षा भानुशाली :-**

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते, अगोदर अधिकाऱ्यांना बोला शपथ घ्यायची आणि त्यांच्याकडून गाडी परत घ्या आणि त्यांना मोटर सायकल द्या फिरायला. ४-४ वेळा फोन करायचा नंतर एका जागेवरती कचरा उचलत नाही ते. म्हणजे गाडी परत घ्या आणि मोटार सायकल द्या त्यांना आणि ऑफिसमधून बाहेर निघायला सांगा त्या लोकांना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण कधी फोन केला होता मला.

**वर्षा भानुशाली :-**

तुम्हाला नाही शिंदे जे ..........................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मला बोलताय तुम्ही.

**वर्षा भानुशाली :-**

तुम्ही पण तेच आहात ना साहेब. तुम्हाला पण ४-४ वेळा फोन करायच्या नंतर आम्ही बोलतो की या बिल्डींगमध्ये कचरा आहे तरी पण जात नाही उचलायला आणि सोसायटीवाल्यांना दमदाटी देतात की तुम्ही इथून कचरा उचलला नाही तर फाईन लावणार म्हणजे एक आदर्श सोसायटी आहे. कचरा गोळा करुन ते ठेवतील तरी आपण त्यांना दमदाटी देतो आणि आपण शपथ इथे आम्हाला घ्यायला सांगता तुम्ही. आम्ही आमचे बरोबर करत आहे काम साहेब तुम्ही काहीतरी काम करा आता. आणि मॅडम मी तुम्हाला रिक्वेस्ट करते गाडी परत घ्या सगळ्या अधिका-यांची आणि मोटर सायकल द्या म्हणजे त्यांना आजूबाजूला कस आहे ते दिसायला पाहिजे. सायकल द्या सायकल. साहेब आपण हसून सगळे विषय असेच फेटाळतो. तुम्ही शिंदे साहेबांना फोन करा. आपण प्रत्येक वेळा हसून विषय तिथेच संपवतो. तुम्ही आज याच्यावरती काही तरी निर्णय घ्या. तर आम्ही पण तुम्हाला मानतो की नाही खरोखर. लगेच काम होत आहे. शिंदे साहेब को मैंने चार बार फोन किया है। आज भी सुबह झापके आयी कचरा वही के वही पडा है। और सब चीजे हम लोग हसने में निकाल देते है।

**मा. आयुक्त :-**

शिंदे साहेबांना बोलवा रे।

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम, कमिशनर साहेब नवघर रोड के फुटपाथ पर हर जगह पे फर्निचर का दुकान लगाया जाता है। दुकान १०० फुट की है और पुरा फुटपाथ कव्हर करके फर्निचर रखा जाता है। कई बार प्रभाग कार्यालय में कम्पलेंट की है। कई बार अधिकारीयों को बोला यह भी एक स्वच्छता का विषय है और प्रत्येक बिल्डींग में जब रिपेअरींग होती है तो गोणी भरभर के उसके डेब्रिंज बाहर रखे जाते है। ना कोई हटाते है ना कोई गाडीवाले हटाते है। गाडीवालों को पैसा देंगे तब वो हटाते है। यह कैसे चलेगा? कैसे साफसफाई होगा। पुरे मिरा भाईंदर में जैसल पार्क के पुरे कॉर्नर से स्टेशन परिसर के पास देखिए आप पुरे भाजीवाले बैठे है। उसको अधिकृत कोई नही है, लेकिन पुरा परिसर कन्जस्टेड करके रखा है। मेरी आपसे विनंती है आर.एम.पी. पार्क, जैसल पार्क और नवघर रोड वो परिसर में भाजीमार्केट हमने बडे-बडे गटर बनाके दिए थे उस टाईप पे सुदाम गायकवाड साहब भी उसके उपर राऊंड मार रहे थे। हमने मार्कींग करके दिया था ४X६'' का उनको मार्केट जैसे बनाके इअरली भाडा लेने का लेकिन कुछ हुआ नही। २००७ की बात है आज तक कुछ हुआ नही। और हमारे यहाँ कोई मार्केट है नही। आज १५ लाख लोगो के लिए कितने मार्केट है जरा इसका जवाब देंगे कमिशनर साहब। मिरा भाईंदर की आबादी १५ लाख है। उसमें मार्केट कितनी है?

**मा. महापौर :-**

पांडेजी आप प्लीज बैठ जाइए। सबसे पहले हमे यहाँ शपथ लेनी है।

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

सर्वांनी उजवा हात पुढे करावयाचा आहे. माझ्या मागून सर्वांनी शपथ वाचायची आहे. महात्मा गांधीनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले होते त्यामध्ये फक्त राजकिय स्वातंत्र्य नव्हते तर त्या सोबत एक स्वच्छ व विकसित देशाची कल्पना पण होती. महात्मा गांधीनी गुलामीच्या जोरखंडातून भारतमातेला मुक्त करुन स्वातंत्र्य मिळवून दिले आता भारतमातेला अस्वच्छतेला मुक्ती देऊन देशाची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे. मी शपथ घेतो की मी स्वतः स्वच्छतेच्या प्रतीक जागरुक राहीन. आणि त्यासाठी वेळही देईल. दरवर्षी १०० तास म्हणजेच प्रत्येक आठवड्यातून दोन तास श्रमदान करुन स्वच्छतेच्या ह्या संकल्पनेला पूर्ण करीन. मी स्वतः घाण करणार नाही आणि दुस-यालाही करु देणार नाही. सर्वप्रथम मी स्वतःपासून माझ्या कुटुंबापासून माझ्या गल्लीत, वस्तीपासून माझ्या गावापासून तसेच माझ्या कार्यशाळापासून ह्या कामास सुरुवात करेल. मला हे मान्य आहे की जगामध्ये जे देश स्वच्छ आहेत त्याचे कारण त्या ठिकाणचे नागरिक स्वतः घाण करीत नाही व घाण करु देत नाही या विचारांनी मी गावोगावी आणि गल्लोगल्ली स्वच्छ भारत मिशनचा प्रचार करेन मी आज जी शपथ घेत आहे ती आणखी १०० लोकांकडून करुन घेईन. ते पण माझ्यासारखे स्वच्छतेसाठी १०० तास देतील. यासाठी मी प्रयत्न करीन मला माहित आहे की स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले माझे पाऊल संपूर्ण भारत देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करेल. (सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांनी सभागृहात वरीलप्रमाणे शपथ घेतली.)

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सप्तपदी पण एक आहे. सात मुद्दे आहेत ती वाचतो ती आपण माझ्या मागून वाचायची. माझे पहिले पाऊल सहभागाच्या काम निर्धाराचे. दुसरे पाऊल व्यापक लोक सहभाग मिळविण्याचे. तिसरे पाऊल १०० टक्के शौचालयाचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे. चौथे पाऊल कच-याचे संकलन वर्गीकरण वाहतुक करण्याचे आणि पाचवे पाऊल कच-यावर शास्त्राक्त प्रक्रिया करण्याचे, सहावे पाऊल सांडपाण्यावर प्रक्रिया

करण्याचे, सातवे पाऊल हरित स्वच्छ महाराष्ट्र साकार करण्याचे जयहिंद जय महाराष्ट्र. (सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांनी सभागृहात वरीलप्रमाणे शपथ घेतली.)

**वर्षा भानुशाली :-**

साहेब माझ्या वॉर्डमध्ये पूर्ण इंडस्ट्रीयल एरिया आहे. आणि जेवढ्या बिल्डींग आहेत त्याच सगळ्या गटार इंडस्ट्रीयलच्या निघत आणि मी परत सांगत आहे की ते राऊंडमध्ये येतच नाही आणि त्यांच्या खालचे लोक त्यांचे साहेब आहे.

**संदिप शिंदे :-**

मॅडम तो विभाग जो आहे ते कांबळे साहेब आहेत ते बघत आहे. दोन मिनिट थांबा त्यांना बोलवून.......

**वर्षा भानुशाली :-**

आता कांबळे ला बोलवा नंतर त्यांच्या खाली असतील त्यांना पण बोलवा.

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये तुम्ही उत्तर देत आहात इथे उपायुक्त आरोग्य विभागाचे तुम्ही मुख्य सॅनिटरी इन्स्पेक्टर आहात. संबंधित विभागाला बोलावता काय? त्या भडव्याला सस्पेन्ड करुन टाका कोण काम नाही करत त्याला लक्षात आलं का? तुम्ही आजच्या आज फाईल पुटअप करा माझ्याकडे.

**प्रेमनाथ पाटिल :-**

मा. आयुक्त साहेब आज शहरामध्ये पूर्ण प्रकारे कचरा, झाडु काढणे सर्व बंद आहे त्याच कारण काय? शहरामध्ये पूर्ण मिरा भाईंदरमध्ये साफसफाई बंद आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आज संपूर्ण शहरामध्ये सफाई कामगारांनी मोर्चा काढलेला आहे. श्रमजीवी संघटनेने.

**प्रेमनाथ पाटील :-**

कशाबद्दल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना कायम करणे त्यांना १४ हजार पगार देणे, विविध मागण्या होत्या. संपूर्ण महाराष्ट्राचा संप आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पानपट्टे साहेब ठिक आहे. आपले पण ५१३ सफाई कामगार आहेत आज ते रजेवर आहेत तर आपले सफाई कामगार काय करत आहेत.

**शरद पाटील :-**

महापौर मॅडम या विषयावर फार मोठी चर्चा होणार आहे आणि पटलावरचे विषय संपल्यानंतर आपण या चर्चेला वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विषयावरती चर्चा करायची नाही का आपण असा विषय आहे का तो.

**मा. महापौर :-**

आपल्याला बोलायला दिलेले नाही आपण बसा.

**जुबेर इनामदार :-**

सभागृह नेते चर्चा होणार ना.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम त्यांना बोलू द्या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम त्यांना बोलायची परमिशन द्या.

**मा. महापौर :-**

यह चर्चा अभी विषयपर नही है। सब यह चर्चा करना चाहते की यह बंद क्यों है।

**जुबेर इनामदार :-**

मॅडम आरोग्याचा विषय आहे तो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आरोग्याचा विषय आहे आपण शपथ घेतलेली आहे तरी चर्चा करणे हे क्रमप्राप्त आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजेच या विषयावर चर्चा नाही होणार हे कसे शक्य आहे.

**भगवती शर्मा :-**

मॅडम आम्ही आमची शपथ परत घेतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाला विनंती आहे मी थोड निवेदन करु इच्छितो की हे केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या स्वच्छ भारत अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्याबाबत. ही

केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची जी स्किम आहे तर ही स्किम काय आहे? हे आपल्या सभागृहाला अवगत करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आणि यापूर्वी भारत स्वच्छता अभियानाची सुरुवात आपल्या महानगरपालिकाने मला वाटते ८-१० महिन्यांपूर्वीच केलेली आहे. मागच्या दोन ऑक्टोबरपासून केलेली आहे. त्याच्यानंतर आता महाराष्ट्र राज्यामध्ये सप्तपदी स्वच्छतेची अशी संकल्पना महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी २९/०५/२०१५ रोजी संपूर्ण कोकण डिव्हिजन मधल्या सन्मा. महापौर आणि आयुक्त, मा. मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांची बैठक घेऊन हा प्रोग्राम जाहीर केलेला आहे. म्हणून आपल्या सभागृहाला याची शपथ आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना अगोदरच दिली आहे. सभागृहाला याच अवलोकन व्हाव सभागृहाला याची माहिती मिळावी. आणि सभागृहाला काय शासनाच्या योजना आहेत, या योजनेची माहिती मिळावी म्हणून हे आपल्या सभेसमोर विषय आणलेला आहे. त्याच्या अनुषंगाने आपले काही स्वच्छते बद्दल प्रश्न जर असतील तर त्या बद्दल मा. महापौरांनी आपल्याला सांगितले की पटलावरचे विषय संपल्यानंतर आपण या विषयावर बोलाव. फक्त स्किम महाराष्ट्र शासनाची आणि केंद्र शासनाची काय आहे हे सभागृहाला अवगत करण्यासाठी विषय आणण आमच चूक आहे का? आणि आम्ही हा विषय आपल्या समोर आणलेला आपल्याकडून शपथ घेतलेली आहे. तुम्हाला शपथ देण्याचा उद्देश असा आहे की आपण लोकप्रतिनिधी आहात. आपल्या प्रभागाचे आपण त्या ठिकाणचे सन्मा. सदस्य म्हणून निवडून आलेले आहात. आपल्या प्रभाग समितीमध्ये एकूण १७-१८ जे काही निकषाप्रमाणे सन्मा. सदस्य असतील त्यांची एक प्रभाग समिती होते आणि प्रभाग अधिकारी आणि त्या ठिकाणी प्रभाग समितीचे सभापती काम पाहतात हे सगळ करत असताना या सर्व घटकाला विश्वासात घेऊन आपल्याला ही स्किमची माहिती देण्याचा उद्देश असा आहे की आपण तळागळापर्यंत काम करणे व्यक्ती आहात वॉर्डावॉर्डामध्ये त्याच्यामुळे सामान्य माणसापर्यंत ही स्किम पोहोचली पाहिजे म्हणून आमच्या सन्मा. नगरसेवक, नगरसेविकांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाची काय संकल्पना आहे. केंद्र शासनाची काय संकल्पना आहे याच्या मागची भूमिका काय आहे याला लागून पुढचे विषय येणार आहेत. तर त्याच्यामुळे आपण ही शपथ घेतोय. शपथ घेतोय म्हणजे सगळी जबाबदारी टाळतो असे नाही. शपथ दिली म्हणजे विषय संपला असा नाही. दैनंदिन कचरा उचलायचा जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत ते कचऱ्याचे प्रश्न संपणार नाहीत. आज कचरा उचलला उद्या कचरा होणार, उद्या उचलला परवा होणार, परवा उचलला तेरवा होणार. हे आपण मरेपर्यंत कचरा साठतच राहणार. आपण मेलो तरी कचरा दुसऱ्या दिवशी येणार, तिसऱ्या दिवशी येणार. असा प्रश्न आहे ज्याच्यामुळे हे दैनंदिन व्यवस्थेमध्ये जसे आपल्याला आज पाणी पिले म्हणून उद्या प्यावं लागत नाही असा विषय नाही. म्हणून ही महाराष्ट्र राज्याची आणि केंद्र शासनाची जी काही संकल्पना आहे जी काही स्कीम शासनाने डिक्लेअर केली आहे ती सभागृहाच्या निदर्शनास आणून देण. आद्य कर्तव्य प्रशासनाच ठरतं म्हणून आपल्या समोर आज शपथ आपल्या माध्यमातून घेतली आहे. म्हणजे आम्ही घेतलेली आहे. आपल्याला शपथ दिली आहे आपण या समाजातला एक महत्वपूर्ण घटक आहात आणि आपल्या सहभागा शिवाय आपल्या सोबत आपल्या कार्यकर्त्यांचा सहभाग, आपल्या वॉर्डातल्या संपूर्ण नागरिकांचा सहभाग असल्याशिवाय ही स्किम यशस्वी होणार नाही. तर त्यामुळे आम्ही आपल्याला ही शपथ देण्याचा उद्देश असा आहे की आपण आपल्यासोबत १०० माणसांना, कार्यकर्त्यांना, आपल्या वॉर्डातल्या प्रत्येक नागरिकांना शपथ देवून सगळ्याच्या सहभागाशिवाय भारत स्वच्छ होणार नाही किंवा आपल शहर स्वच्छ होणार नाही. आणि आपल शहर स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यासाठी आमची धडपड चालू आहे. तो विषय सुध्दा आपला पुढे आलेला आहे. त्या अनुषंगाने मी पुन्हा काय निवेदन करायच ते करणार आहे. परंतु याच्यामध्ये आरोग्याची सफाई होत नाही हा विषय महापौर मॅडम म्हटल्या आपल्याला की विषय संपल्यानंतर विशेष सभेमध्ये पटलावर जे विषय आहे ते विषय सोडून दुसरा विषय बोलण्याची मुभा कायद्यानुसार नाही तरी सुध्दा आपल्या विनंतीला मान देवून महापौरांनी डिक्लेर केलेले आहे की पटलावरचे विषय संपल्यानंतर आपली काय असेल ती चर्चा करायला तयार आहोत. म्हणून सभागृहाला विनंती आहे आता पुढचा विषय घ्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुमच्या निवेदनावरती भाष्य करणे गरजेचे आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आम्हाला बोलु का देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अहो तुमच्या केंद्र शासनाची ही योजना आहे. ती किती क्लब आहे. तुम्हाला आम्ही दाखवू शकतो. मा. महापौर मॅडम ऐकून घ्या.

**भगवती शर्मा :-**

काका, सभागृहातील प्रत्येक नगरसेवकांची भावना को आप समझना चाहिए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी जे निवेदन केलेले त्याच्यात किती बरोबर आहे आणि किती चूक आहे ते आम्ही त्यांना दाखवू शकतो ना. जोपर्यंत प्रशासन आणि लोकसेवक एकत्र येत नाही. तोपर्यंत ही स्वच्छता मोहित यशस्वी होऊ शकत नाही आणि तुमच्या ज्या उणीवा आहेत त्या तुम्हाला आम्ही दाखवून देतो.

**मा. आयुक्त :-**

हा विषय संपल्यानंतर मा. महापौरांनी कबुल केलेले आहे की आपल्याला विनंती आहे की .............

**दिनेश जैन :-**

मा. महापौर साहेब टाईम दिया उसके लिए हम धन्यवाद करते है की उसके बाद बोलने के लिए इस विषय के बारे में इसलिए यह सभागृह मा. महापौर का धन्यवाद करते है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

धन्यवाद तो हम भी देते है लेकिन सुनने की हिंमत तो रखो ना। हमे ५-१० मिनिट का अभी समय दिजीए हम आपको बताते है की यह केंद्र सरकार की योजना है इसमें आपके महापौरने कसम ली है की मैं टाईम दुँगी तो उसमें दोन तास कहाँ श्रमदान किया तो वह बताओ ना।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

शिस्तीने मी सर्वांना बोलायची संधी देणार. शिस्त ठेवा.

**अनिल भोसले :-**

विरोधी पक्षाच्या सदस्यानां विनंती आहे की मा. महापौर मॅडमनी वेळ दिलेला आहे. आपण सर्वांनी बसुन घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार मा. पंतप्रधान महोदयांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियान व मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान “सप्तपदी स्वच्छते” मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार तसेच उपरोक्त अभियानाबाबत केंद्र शासन व राज्य सरकार यांच्यामार्फत प्राप्त होणा-या निधीतून खालीलप्रमाणे उपक्रम राबविणेत यावे.

१. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरीकांमध्ये जनजागृती करणे कामी होर्डींग्ज, पोस्टर्स, फलक इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करणे.
२. मिरा भाईंदर शहरामध्ये उघड्यावर शौचालयास बसले जाते. अशा ठिकाणी पुरेसे शौचालय बांधणे, राज्य शासन व खाजगी मालकीच्या जागेवर शौचालय बांधणे आवश्यक आहे. शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी तसेच आवश्यकता पडल्यास महापालिकेचा निधी उपलब्ध करून देणे.
३. स्वच्छ भारत अभियान यशस्वी राबविणे करीता रस्त्यावर सार्वजनीक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर शौचास बसणे, रस्त्यावर कपडे धुणे, आंघोळ करणे, रस्त्यावर टाकाऊ बांधकाम इत्यादी साहित्य वस्तु टाकणे, तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या कॅरीबॅगचा वापर करणे इत्यादींवर प्रतिबंध करणे कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन उपविधी २०११ मंजुर करून शासनास पाठविलेली आहे. त्यामधील नमुद केलेल्या तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणे.

उपरोक्त सर्व कामास येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**डॉ. नयना वसाणी :-**

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे स्वच्छतागृह बांधण्यात आलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | महानगरपालिकेमार्फत स्वखर्च/ अनुदानातुन बांधलेली स्वच्छतागृह | १६७ |
| २) | पे-ॲन्ड युज तत्त्वावर बांधलेली स्वच्छतागृह | ५६ |
| ३) | फायबर प्री-फॅब स्वच्छतागृह | ०६ |
| ४) | मोबाईल टॉयलेट | ०५ |
| | **एकूण** | **२३४** |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधलेली स्वच्छतागृहे ही MMRDA च्या वस्ती स्वच्छतागृह योजनेअंतर्गत चालविण्यासाठी स्थानिक पातळी वरील संस्थाना देण्यात आली होती. तथापी सदर स्वच्छतागृहे ही व्यवस्थिरीत्या स्वच्छ होणे, मासिक वीज बील, पाणी बील न भरणे, आवश्यक दुरुस्ती न करणे इ. बाबत तक्रारी येऊन चालविणाया संस्था सोडून गेल्याने अशी १४३ स्वच्छतागृहाची देखभाल व दुरुस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत संस्था नेमून त्यांना प्रति स्वच्छतागृह रु.२०,०००/- प्रति महिना रक्कम देण्यात येत आहे. तसेच सदर स्वच्छतागृहांचे वीज बील, पाणी बील महानगरपालिका भरत असून आवश्यक दुरुस्ती कामे देखील करण्यात येत आहेत. त्यासाठी दुरुस्ती कामांवर आतापर्यंत रु. १.५० कोटी खर्च केला असून देखभाल व निगा ठेवण्याच्या संस्थावर वार्षिक रु.४.२५ कोटी एवढा खर्च येणार आहे. मिरा-भाईंदर महानगपालिकेचे यापूर्वी सर्व स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व चालविण्यासाठी खाजगी संस्थाना कामे दिली होती. सदर संस्थाना स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून मासिक रुपये २० ते ३५ प्रति कुटुंब रक्कम घेऊन पास देण्यात येत होते. तथापी विशेषतः राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन, पेणकरपाडा, घोडबंदर, काशि या भागातील रहिवाशी सदर रक्कम देत नसल्याने तक्रारी, भांडणे होत होती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संस्थानी कामे सोडून दिली. स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून नेमलेल्या कंत्राटदराकडून ठरविलेली रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच पाणी बील व वीज बील महानगरपालिकेमार्फतच भरुन सदर रक्कम देखील सदर संस्थाना/ कंत्राटदाराना द्यावयाच्या रकमेतुन कपात करुन घेता येईल. सदर स्वच्छतागृहाच्या सर्व दुरुस्त्या, दैनंदिन साफसफाई विद्युत कामे

देखील सदर संस्थानी स्वखर्चाने कराव्यात. यासाठी निविदा मागवून प्रति कुटुंबावर निश्चित करुन संस्थाची देखील निवड करुन प्रत्येक संस्थेस १५ कामे दिल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवून स्वच्छतागृहाबाबत नियोजन करता येऊ शकेल.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजुर.

**दिपिका अरोरा :-**

जुबेरजी आप इतना बोलने की जगह चर्चा किजीए ना. आप बारबार इधर आके क्या साबित करना चाहते है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सभी बैठ जाइए। अगर मुझे लगा की आप विषय के आगे कुछ बोल रहे है, विषय के अलावा कुछ बोल रहे है तो आपको बोलने की परमिशन नही दी जाएगी।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय स्वच्छता.

**मा. महापौर :-**

आप बीच में मत बोलिए। जो मेरे बिना परवानगी उठेंगे मैं बोलने नही दूँगी। और आगे वो जो ठराव पढ रहे है वो मंजूर कर दूंगी। अगर आपको डिसीप्लेन से एक-एक करके बोलना है शांती से मेरी परमिशन से तो ही यह सभा शांती से डिसीप्लेन से चलेगी।

**शर्मिला बगाजी :-**

महापौराच्या परवानगीने बोलते सभागृहात गोंधळ चालू झाला आहे मी फक्त एवढीच विनंती करेल की एक-एक विषयावर आम्हाला चर्चा करायला संधी दिली तर फारच बर होईल.

**मा. महापौर :-**

मॅडम मी चर्चेला नाही सांगत नाही. विषयाला धरुन बोलत नाही. मी विनंती करते वारंवार विषयाला धरुन बोला. हे आपल ठराव काय आहे स्वच्छ भारत स्मार्ट सिटीचा ठराव आहे. तुम्ही माझ्या वॉर्डात हे झाल नाही, ते झाल नाही तो आजचा विषय नाही आहे. मी मान्य करते तुमच्या वॉर्डात सगळ्यांना प्रॉब्लेम आहे. माझ्याही वॉर्डात प्रॉब्लेम आहे. पण आजचा विषय माझ्या वॉर्डात किती कचरा पडला आहे ते नाही. आपल्याला स्मार्ट सिटीसाठी हे सगळे ठराव करुन घ्यायचे आहेत. आपल्याला उद्या लास्ट डेट आहे स्मार्ट सिटीचे ठराव पास करायला म्हणून आज आपण हे सगळे ठराव पास करुन घेत आहोत.

**शर्मिला बगाजी :-**

हा विषय आणला त्याबद्दल चांगलीच गोष्ट आहे. चांगला विषय आहे. पण मला एकच विचारायच आहे. माझ्या वॉर्डाचा एकटीचा प्रश्न नाही इथे तुम्ही सप्तपदी स्वच्छतेमध्ये चौथा पॉईंट आहे मी याच्यामध्ये थोडासा खुलासा मांडते. चौथे पाऊल कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वाहतुक करण्याचे आणि पाचवे पाऊल कचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. आता तुमची पुढे याच्याबद्दल काही तरी स्टेज असेलच पण आता जे तुम्ही शास्त्राक्त पध्दतीने आपला कचरा विल्हेवाट लावता का? कारण सध्या पूर्ण शहराचा कचरा आपला घनकचरा प्रकल्प जो बंद आहे तिथे चाललेला आहे तरी या बद्दल तुमची पुढची काय प्लानिंग आहे का? किंवा तसच ते डम्प करायच आणि उत्तन गावामध्ये पूर्ण कचरा तो भरुन आम्ही तिथेच वाहून जायच का? अस असेल तर त्याच जरा खुलासा करा कारण ते महत्वाच आहे. पूर्ण शहराचा कचरा एकाच ठिकाणी जातो आणि तो प्रोजेक्ट आपला तीन वर्ष बंदच आहे. तर मला अस वाटत की, महापौर मॅडम तुम्हाला पण विनंती करेल आणि आयुक्त साहेबांना पण की तिथे जाऊन जरा विजिट करा आणि बघा तिथे काय परिस्थिती आहे. त्यामुळे आमच्या गावाच किती नुकसान झालेले आहे. तर मला सांगा याबद्दल तुम्ही काय विचार केलेला आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २००० नुसार कचरा दैनंदिन साफ करतो, बंदिस्त गाड्यामधून आपण वाहतुक करतो फक्त वर्गीकरण आणि प्रक्रिया होत नाही. प्रक्रिया करण्या संदर्भात तीन तारखेला जाहिर निविदा काढलेली आहे. लोकसत्ता, टाईम्स ऑफ इंडिया मोठ्या पेपरमध्ये ही प्रसिध्द केलेली आहे. ४५ दिवसानंतर सकवार येथे प्रोसेसिंग करणार आहोत.

**शर्मिला बगाजी :-**

पानपट्टे साहेब, एवढ्या हजारो टन ने तो कचरा तिथे पडलेला आहे वर्गीकरण न करता त्याच तुम्ही वर्गीकरण करणार आहात का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वर्गीकरणची आवश्यकता नाही यामध्ये वेस्ट टू याच्या मध्ये संपूर्ण कचरा जाळून तिथे एनर्जी तयार करते.

**शर्मिला बगाजी :-**

मग एवढा कचरा म्हणजे तुम्ही आम्हाला शाश्वती देत आहात की, तुम्ही उचलणार आहात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जे काही तिथला नविन कचरा आहे ते पण उचलणार आहोत आपण.

**शर्मिला बगाजी :-**

नविन म्हणजे एवढा हजारो टन पडलेला कचरा तो तसाच राहू द्यायचा का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही नविन जो कचरा निर्माण झाला आहे तेवढाच.

**शर्मिला बगाजी :-**

नविन कचरा म्हणजे तुम्ही २ वर्ष तो कचरा तिथेच जळतोय तिथे आमच प्रदुषण होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मान्य आहे. पण तिथल्याच लोकांनी प्रकल्प बंद पाडला काय करणार त्याला?

**शर्मिला बगाजी :-**

प्रकल्प बंद पडला याला जबाबदार कोण? प्रशासन जबाबदार आहे कारण त्या कॉन्ट्रॅक्टरवर तुम्ही काही कारवाई केली का? ज्या कॉन्ट्रॅक्टरने हा प्रकल्प बंद पाडला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तो प्रकल्प चालूच दिला नाही लोकांना तिथल्या. शेवटी महासभेने निर्णय घेतला स्थलांतराचा. आपण सर्वांनी निर्णय घेतलेला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

पानपट्टे साहेब जर इथे बंद झाल नाही कचरा टाकण तर आज ना उद्या तिथे आंदोलन होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

म्हणूनच गांभिर्य आहे तळोजा ठिकाणी सुध्दा आपण कन्सन घेतलेला आहे. त्यांना सुध्दा पत्रव्यवहार चालू आहे आपला सकवार येथे आपण नविन जागा घेतली सगळ्या एन.ओ.सी. प्राप्त केलेल्या आहेत. एन.ओ.सी. करुन टेंडर ही काढले आहेत. कन्सल्टंट नेमलेला आहे. मी मान्य करतो पण इलाज नाही त्याला इतर महानगरपालिकेपेक्षा आपली परिस्थिती फार वेगळी आहे. आता ४५ दिवसांनंतर वर्क ऑर्डर गेल्यानंतर प्रकल्प चालू होईल त्या ठिकाणी.

**मा. महापौर :-**

मॅडम आपला खुलासा झाला आहे.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो पानपट्टे साहेब विषय घनकचरा उत्तनचा आहे. आजची एक बातमी आहे जन आंदोलन समिती आहे ती हरित लवादाकडे गेलेली होती आणि त्यांनी एक दिड वर्षाच्या आतमध्ये आपल्याला कचरा प्रकल्प चालू करायचा आदेश दिला आहे. त्याचप्रमाणे ७० कोटी मिरा भाईंदर महानगरपालिकेला कोकण आयुक्तांकडे भरायच अस आदेश आहे. याच्या बद्दल खुलासा काय? जेणेकरुन त्या उत्तन विभागाच्या सर्व नगरसेवकांचा समर्थन होऊ शकते.

**भगवती शर्मा :-**

मॅडम जैसे की यह मॅडमने और उपमहापौर साहबने कहाँ, उत्तन नागरिक हक समितीने बारबार आंदोलन डम्प करने के बावजूद उसके अंदर में वहाँ पे कचरा डंम्प बराबर नही हो रहा था। तो उन्होंने ग्रीन ट्री ब्युनल में केस दायर किया था। और ऊस केस दायर होने के अंदर में सुनावाई होने के बाद में कल उसका एक निर्णय आया है। निर्णय के अंदर में कहाँ गया है की, मिरा भाईंदर महानगरपालिका ७० कोटी रुपया ६ विक के अंदर में कोकण आयुक्त के पास जमा करना है। लेकिन उसी ट्रीब्युनल आदेश के अंदर कहाँ गया है मॅडम की उत्तन येथील सध्याच्या प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन ग्रामस्थांना होणारा त्रास दूर करण्याचा प्रयत्न करावे. आपको ऊस ग्रीन ट्रीब्युनल ने आदेश दिया है आप इस हाऊस के अंदर में वस्तुस्थिती की जानकारी दे करके और उसके उपर आप आगे क्या कारवाई करेंगे उसकी हमको सविस्तर जानकारी दे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सदर प्रश्न प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने भाष्य करणे योग्य नाही. ३१ तारखेला पुन्हा केस आहे. तर पुढच्या काय स्टेप्स आहेत. सविस्तर ऑर्डर आल्यानंतर त्यात काय-काय उपस्थित केले आहे त्याचा सविस्तर अभ्यास करुन त्यावर कारवाई करणार. आजच्या घडीला काय करणार आम्ही ते उचित होणार नाही.

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर मॅडम या ट्रीब्युनल कोर्टने जी काही मार्गदर्शन तत्व सांगितलेली आहेत त्याप्रमाणे काय कारवाई केली यांनी फक्त माहिती द्यावी. त्याच्यामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे कशाला माहिती लपवतात देण्याची.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, ग्रीन ट्रीब्युनलमध्ये कालच केस होती त्याच्यामध्ये पानपट्टे साहेबांनी आपल्याला खुलासा केला आहे जे काही आदेश झालेले आहेत त्याची कॉपी आमच्यापर्यंत पोहोचल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. आणि उद्या ३१ तारखेला परत तारीख आहे म्हणतात त्यामध्ये अस एवढ स्पष्ट सांगितल असताना पुन्हा अजुन आपण त्याच्यावर काटेकोर चर्चा करणे योग्य वाटत नाही.

**राजेश वेतोसकर :-**

३ वर्ष झाले प्रोजेक्ट बंद आहे.

**मा. महापौर :-**

सर वो सबने बोल दिया है ३ साल से प्रोजेक्ट बंद है और अभी आपको पानपट्टेजी ने खुलासा दिया है।

**मा. आयुक्त :-**

महापौर मॅडम, मी याचा खुलासा करतो ३ वर्षापासून प्रोजेक्ट बंद आहे. हे सगळ्या जगाला माहित आहे. ५ महिन्याच्या आतमध्ये त्याच्यामध्ये टेक्नीकल बॉडीची अपॉईंटमेंट करुन तो प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात आला. रिपोर्ट तयार केल्यानंतर त्याची कन्सल्टंसी एका एक्स.वाय.झेड व्यक्तीकडून तयार करुन घेतली आणि त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन घेतल्यानंतर भारताच्या स्तरावरती जो पेपर जातो टाईम्स ग्रुपच्या एका पेपरला प्रसिध्दी दिली. राज्य शासनाच्या एका स्तरावर प्रसिध्दी दिली आहे आणि टेंडर प्रोसेसमध्ये आहे. हे टेंडर फाइनल झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

**राजेश वेतोसकर :-**

पण साहेब या आपल्या वॉर्डमध्ये साहेब ही सबब सांगुन आमच्या येथे मैदानामध्ये कचरा खाली केला जातो.

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम, कमिशनर साहब हमारे मिरा भाईंदर क्षेत्र में इंडस्ट्री बहुत बडे प्रमाण में है और इंडस्ट्री में शौचालय की बहुत जादा असुविधा है। पुरे मिरा भाईंदर की बात कर रहा हूँ। खाली अपने वॉर्ड की बात नही कर रहा हूँ। काका का वॉर्ड भी इंडस्ट्रीज में आता है। भानुशाली मॅडम का वॉर्ड भी इंडस्ट्रीज में आता है। सभी जगह शौचालय की और गटार की व्यवस्था नही है। हमने २०१० से इंडस्ट्रीयल फंड ऐसा डेव्हलपमेंट फंड पास करके रखा था। उसके अंतर्गत कोई काम नही हो रहा है। मेरी यह विनंती है आप लोगो से की इंड्रस्टीज के लिए हर जगह इंडस्ट्रीज में शौचालय की सुविधा करिए। और इंडस्ट्रीज में गटार की सुविधा किजिए। और रास्ता सिमेंटकरण करके दिजीए।

**प्रभात पाटील :-**

प्रथम ठराव काय झाला मला कळल नाही परंतु मला या ठरावामध्ये मला एक गोष्ट नमुद करावीशी वाटते. तुम्हाला सुचना वाटली तर घ्या अन्यथा कारवाई करता आली तर ती करा. फार चांगला विषय आहे आपल्याकडे आपण म्हणतो की थेंबेथेंबे तळे साचे. आपण प्रत्येकाने जर तसे नियोजन केले प्रत्येकाने आज शपथ घेतल्याप्रमाणे वागल इतर १० लोकांना ती शपथ दिली तर निश्चीतपणे माझ गाव स्वच्छ होईल. माझ शहर स्वच्छ होईल पर्यायाने भारत स्वच्छ होईल खूप चांगली संकल्पना आहे आणि त्यामुळे या संकल्पनेचे मी स्वागत करते. परंतु मॅडम ठराव काय झाला पुन्हा एकदा सांगते मला माहित नाही आपण मंजूरी दिलेली आहे. ही चांगली गोष्ट आहे कारण त्याच्यासाठी आर्थिक, प्रशासकीय मंजूरी लागणारच आहे. आणि आर्थिक प्रशासकीय मंजुरी आपण एवढ्यासाठी कदाचित देणार असतो की आपल्याला त्यासाठी स्वच्छता अभियानाला कर्मचारी लागणार आहे. २०१० की १२ मध्ये आपल्याला स्वच्छतेचा ठेका दिला आहे. आज ३-४ वर्ष झाली ना ठेका देऊन २०१२-२०१५ या कालावधीत या शहराची संख्या तीन पटींनी वाढली असेल नाही म्हटल तरी एकपट तरी वाढली असेल. माणस तीच आहेत. माणस वाढलेल्या प्रमाणामध्ये, लोकसंख्या वाढलेल्या प्रमाणामध्ये आपण कर्मचारी वाढवले नाही. कर्मचारी तेच आहेत. महागाई वाढते आहे कर्मचा-यांचे पगार वाढवावे म्हणून कदाचित आजचा संप असेल या गोष्टीचा विचार आपण ठरावात केला पाहिजे. परंतु मला वाटते ही स्वच्छ भारत संकल्पना राबवण्यासाठी तुम्हाला त्याच्यामध्ये कर्मचारी, सफाई कामगार प्रोव्हाईड करावे लागतील हा एक मुद्दा. कारण तुम्ही आहे त्याच माणसामध्ये स्वच्छ भारत करु शकत नाही. त्याच्यामुळे शहर स्वच्छ होण सुध्दा दुरापास्त झाल आहे हा एक मुद्दा दुसरी गोष्ट आहे की क्लिन बिल्ट मार्शल मला माहित नाही की ठरावामध्ये तो उल्लेख आला आहे की नाही. हे जे मार्शल आहेत हे मार्शल आपल्याला खुप गरजेचे आहे. कदाचित आपल्याला मार्शलची योजना राबवायला खूप त्रास होईल. मी १ साधारण उदा. सांगतो की, नवघर नाका घ्या किंवा तुमच्या बंदरवाडीचे एस. टी. स्टॅन्ड घ्या किंवा तो परिसर घ्या कोणीही पर्सनली ही गोष्ट घेवु नये. रिक्शात बसलेली माणस थुंकत असतात. रिक्शावाला थुंकत असतो, माणसं सिगारेट ओढतात फेकुन देतात. ब-याचदा माणसे खोकतात शिंकतात तिथेच सगळी घाण करतात. बिल्ट मार्शल अशाठिकाणी ठेवण्याची योजना सुध्दा तुमच्या या संकल्पनात असली पाहिजे. आपल्याला त्रास होईल लोकांना कोणी त्या बिल्ट मार्शलने मारलं ओरडल तर नगरसेवकाकडे जाईल, आपल्या पालिकेत तो या विषयावर तक्रार करेल परंतु ही संकल्पना राबविताना जरी त्रास झाला तरी स्वच्छतेचे धडे याच योजनेतून दिले पाहिजे ही गोष्ट सुध्दा आपल्याला नाकारता येणार नाही. म्हणून बिल्ट मार्शलची योजना कमीत कमी एक संकल्पना म्हणून एक प्रयोग म्हणून तुम्ही शहराच्या काही भागामध्ये सुरू करावी अशी माझी सुचना आहे. आणि तिसरी

सुचना अशी आहे माझी की हे सगळया गोष्टी करत असताना सफाई होत असेल, झाडू मारत असे कचरा उचलत असेल मॅडम चार शहरामध्ये रोज गटारांची कामे निघतात नाल्याची काम निघतात भुयारी गटाराची काम निघतात गटारे नाले साफ होतात तो कचना तो ठेकेदार म्हणा किंवा कोणी म्हणा तो त्या शहराच्या गटाराच्या बाजूने,नाल्याच्या बाजूने तसाच पडून असतो. लोकांना अस वाटते हा कचऱ्याचा ढिग आहे आणली पिशवी टाकली त्याच्यावर सगळया नगरसेवकांना याची कल्पना आहे तेव्हा हा जो कोणी ठेकेदार असेल त्यांनी मोठया योजना आहेत आपल्याकडे भूयारी गटारी सारख्या या संपूर्ण ठेकेदारांची जबाबदारी आहे की, ते ड्रेनेज उचलायचे त्यांनी तिथे ठेवायचेच नाही हे कच-याचे ढिग आहे की ड्रेनेज आहे तेच कळत नाही कोणीच उचलत नाही कारण प्रत्येक जण म्हणतो आमची जबाबदारी नाही. या ३ गोष्टींचा उल्लेख तुम्ही केल्या तर ठीक आहे नाही तर मी सुचना देवू तर तुम्ही घ्या अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**दिनेश जैन :-**

अभी जैसे मॅडमने बोला की जो गटार में से कचरा निकालते है वो कचरा जो बाहर रखते है उसके उपर मच्छर बारीश मैं बहोत होते है। तो अपुन ने ठराव किया था फॉगिंग मशीन तो मशिन अभी तक आया की नही आया? क्योंकी बारीश में हम जो छाटनी करते है ना तो वो रहता नहीं है।

**सुर्यकांत म्हात्रे :-**

आता ही चांगली गोष्ट आहे की आयुक्तांनी शपथ घातली आहे. मला आयुक्तांना ऐवढेच सांगायचे आहे की तिथे मासे विक्रेते एवढी घाण करतात मॅडम त्या नाल्यामध्ये ते कचरा टाकतात. मोठे किडे निघतात त्यातून आपले प्रभाग अधिकारी त्यांना कारवाई करायला गेले की त्या बायका मंडळी त्या अधिकाऱ्यांवर कम्पलेंट करतात की माझ्या अंगावर हात टाकला म्हणून. दुसरी गोष्ट मेन रोडला लागून जो नाला आहे त्याच्यावर भिकारी लोक हे आपलं बस्तान मांडून बसले आहेत. तिथेच ते घाण करतात शौचालय करतात. आपले अधिकारी दररोज जातात गाडी मधून पण ते कानडोळा करतात त्यांच लक्ष तिकडे नसते का ? ती साफसफाई कोण करणार ? आयुक्त साहेबांनी पण वारंवार बघितले असेल आज गोल्डन नेस्ट सर्कलला पण ते फर्निचर वाले बाहेर जुन फर्निचर टाकून ठेवतात ते आरोग्याला किती घातक आहे. आज आयुक्तांच्या, आपल्या अधिका-याच्या गाडया वारंवार त्या रस्त्याने जातात पण ते सगळे जण डोळे झाक करतात. मला एवढच सांगायचे की, तुम्हाला स्वच्छते विषयी शपथ घातलीय ना त्यावर बारकाईने लक्ष द्या. आणि स्वच्छता करण्याचे प्रयत्न करा. नाहीतर आम्हाला वारंवार तिथे जाऊन मारामारी करावी लागते.

**रेखा विराणी :-**

मा महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, महापौर मॅडम पाणपट्टे साहेबांनी आत्ताच सांगितले की, सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता केलेली आहे परंतु शहरात आणखी अशी शौचालये आहेत की, जी वापरण्या योग्य नाहीत .

**मा. महापौर :-**

मॅडम, आपण ठराव ऐकला नाही. आपण त्यात ठराव केला आहे त्या शौचालयासाठी. आपण बसून घ्या.

**प्रकरण क्र. ६१ :-**

केंद्र शासन व राज्य शासनामार्फत येणाऱ्या स्वच्छता अभियान महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मा. पंतप्रधान महोदयांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियान व मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान "सप्तपदी स्वच्छते" मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार तसेच उपरोक्त अभियानाबाबत केंद्र शासन व राज्य सरकार यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या निधीतून खालीलप्रमाणे उपक्रम राबविणेत यावे.

१. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरीकांमध्ये जनजागृती करणे कामी होर्डींग्ज, पोस्टर्स, फलक इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती करणे.
२. मिरा भाईंदर शहरामध्ये उघड्यावर शौचालयास बसले जाते. अशा ठिकाणी पुरेसे शौचालय बांधणे, राज्य शासन व खाजगी मालकीच्या जागेवर शौचालय बांधणे आवश्यक आहे. शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी तसेच आवश्यकता पडल्यास महापालिकेचा निधी उपलब्ध करून देणे.
३. स्वच्छ भारत अभियान यशस्वी राबविणे करीता रस्त्यावर सार्वजनीक ठिकाणी थुंकणे, उघड्यावर शौचास बसणे, रस्त्यावर कपडे धुणे, आंघोळ करणे, रस्त्यावर टाकाऊ बांधकाम इत्यादी साहित्य वस्तु टाकणे, तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या कॅरीबॅगचा वापर करणे इत्यादींवर प्रतिबंध करणे कामी मिरा भाईंदर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन उपविधी २०११ मंजुर करून शासनास पाठविलेली आहे. त्यामधील नमुद केलेल्या तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणे.

उपरोक्त सर्व कामास येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक डॉ. नयना वसाणी व अनुमोदक श्रीम. सिमा शाह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे स्वच्छतागृह बांधण्यात आलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | महानगरपालिकेमार्फत स्वखर्च/ अनुदानातुन बांधलेली स्वच्छतागृह | १६७ |
| २) | पे-ॲन्ड युज तत्त्वावर बांधलेली स्वच्छतागृह | ५६ |
| ३) | फायबर प्री-फॅब स्वच्छतागृह | ०६ |
| ४) | मोबाईल टॉयलेट | ०५ |
| | **एकूण** | **२३४** |

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधलेली स्वच्छतागृहे ही MMRDA च्या वस्ती स्वच्छतागृह योजनेअंतर्गत चालविण्यासाठी स्थानिक पातळी वरील संस्थाना देण्यात आली होती. तथापी सदर स्वच्छतागृहे ही व्यवस्थिरीत्या स्वच्छ होणे, मासिक वीज बील, पाणी बील न भरणे, आवश्यक दुरुस्ती न करणे इ. बाबत तक्रारी येऊन चालविणाया संस्था सोडून गेल्याने अशी १४३ स्वच्छतागृहाची देखभाल व दुरुस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत संस्था नेमून त्यांना प्रति स्वच्छतागृह रु.२०,०००/- प्रति महिना रक्कम देण्यात येत आहे. तसेच सदर स्वच्छतागृहांचे वीज बील, पाणी बील महानगरपालिका भरत असून आवश्यक दुरुस्ती कामे देखील करण्यात येत आहेत. त्यासाठी दुरुस्ती कामांवर आतापर्यंत रु. १.५० कोटी खर्च केला असून देखभाल व निगा ठेवण्याच्या संस्थावर वार्षिक रु.४.२५ कोटी एवढा खर्च येणार आहे. मिरा-भाईंदर महानगपालिकेचे यापूर्वी सर्व स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व चालविण्यासाठी खाजगी संस्थाना कामे दिली होती. सदर संस्थाना स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून मासिक रुपये २० ते ३५ प्रति कुटुंब रक्कम घेऊन पास देण्यात येत होते. तथापी विशेषतः राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन, पेणकरपाडा, घोडबंदर, काशि या भागातील रहिवाशी सदर रक्कम देत नसल्याने तक्रारी, भांडणे होत होती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संस्थानी कामे सोडून दिली. स्वच्छतागृह वापरणाया कुटुंबाकडून नेमलेल्या कंत्राटदराकडून ठरविलेली रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच पाणी बील व वीज बील महानगरपालिकेमार्फतच भरुन सदर रक्कम देखील सदर संस्थाना/ कंत्राटदाराना द्यावयाच्या रकमेतुन कपात करुन घेता येईल. सदर स्वच्छतागृहाच्या सर्व दुरुस्त्या, दैनंदिन साफसफाई विद्युत कामे देखील सदर संस्थानी स्वखर्चाने कराव्यात. यासाठी निविदा मागवून प्रति कुटुंबावर निश्चित करुन संस्थाची देखील निवड करुन प्रत्येक संस्थेस १५ कामे दिल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवून स्वच्छतागृहाबाबत नियोजन करता येऊ शकेल.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६२, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत.

**शरद पाटील :-**

केंद्र शासनामार्फत लोकांच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी शहरामध्ये "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्याबाबतची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदय यांनी केली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत त्यांच्या संकेत स्थळावर (website) सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे १०.०० लक्ष एवढी असून शहराचे क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे. शहरात एकूण ४६ झोपडपट्ट्या असून झोपडपट्ट्याचे क्षेत्र सुमारे २८३ एकर असून झोपडपट्ट्यातील लोकसंख्या १.५० लक्ष एवढी आहे. सदर झोपडपट्ट्या ह्या खाजगी, केंद्र शासन व राज्य शासन यांच्या जागेत वसल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर योजना राबवून झोपडपट्टीचा विकास व लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून शहराचा विकास सदर योजनेतून करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाबाबत पुढील सुचना प्राप्त होताच सदर योजनेची अंमलबजावणी करावी लागणार आहे. केंद्र शासनामार्फत सन २०१५ ते सन २०२२ या कालावधीत शहरी भागात 'सर्वासाठी घरे' या मिशन मधून "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प मिरा-भाईंदर शहरात राबविण्यासाठी खालील निर्णय घेण्यात येत आहेत.

१) सदर कामासाठी तांत्रिक कक्ष तयार करावा त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांच्या जाहिरात प्रसिध्द करून नेमणूका कराव्यात.
२) सदर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी.
३) सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक सर्व कार्यवाहीसाठी मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करत आहे.

सदर "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) हा प्रकल्प राबविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंण्डेलवाल :-**

मा. महापौर मॅडम इतने देर हात उपर करने के बाद भी आपने मुझे बोलने की संधी नही दी। मैं बहोत गंभीर विषय पे बोलता हूँ। मैं सुबह में गया लॅबोरेटरी डेंग्यू वगैरा सारे रोग जो है ना वो सब अभी मान्सून का सत्र चालू है लेकिन आज की परिस्थिती शहर की ऐसी है, मच्छर की दवाई आज की तारीख में भी अव्हेलेबल नही है। तो कब मान्सून खतम होन के बाद में आयेगी। पूछना चाह रहा हूँ की मान्सून के अंदर मच्छर की दवाई जो है ना उसका ठेका अभी तक नही हूवॉं है। तो कमिशनर साहब यह मच्छर की दवाई कब आयेगी। कभी यह सब फवारणी होगी। आप लोग बोलने नही दे रहे है । इतना सेन्सेटीव्ह विषय है। पाणपट्टे साहब मुझे बताइये की आज की तारीख में यह मच्छर की दवा अवेलेबल नही है।

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त) :-**

औषध आहे आपल्याकडे फवारणी करतोय सर मागवून घेतले आहे सर्व औषध मी. मी दाखवतो तुम्हाला औषध.

**सुरेश खण्डेलवाल :-**

सर औषध नही है आपके किसीभी वॉर्ड में औषध नही है। मॅडम अभी १ घंटा हो गया है। ब्रेकफास्ट का आपने बोला था। लेटर आया है। १०० परसेन्ट आपने जो कहा बिलकूल सही है लेकीन ९५ नगरसेवक के लिए कम से कम वहाँ पे खडे होकर नाश्ता करनेकी व्यवस्था जो है ना आप खुद खडे होकर एक बार देख लिजीए की ९५ सब नाश्ता कर पायेंगे क्या?

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत.

**ठराव क्र. ३५ :-**

केंद्र शासनामार्फत लोकांच्या रहाणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी शहरामध्ये "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्याबाबतची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदय यांनी केली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत त्यांच्या संकेत स्थळावर (website) सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे १०.०० लक्ष एवढी असून शहराचे क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे. शहरात एकूण ४६ झोपडपट्ट्या असून झोपडपट्ट्याचे क्षेत्र सुमारे २८३ एकर असून झोपडपट्ट्यातील लोकसंख्या १.५० लक्ष एवढी आहे. सदर झोपडपट्ट्या ह्या खाजगी, केंद्र शासन व राज्य शासन यांच्या जागेत वसल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर योजना राबवून झोपडपट्टीचा विकास व लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून शहराचा विकास सदर योजनेतून करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाबाबत पुढील सुचना प्राप्त होताच सदर योजनेची अंमलबजावणी करावी लागणार आहे. केंद्र शासनामार्फत सन २०१५ ते सन २०२२ या कालावधीत शहरी भागात 'सर्वांसाठी घरे' या मिशन मधून "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प मिरा-भाईंदर शहरात राबविण्यासाठी खालील निर्णय घेण्यात येत आहेत.

१) सदर कामासाठी तांत्रिक कक्ष तयार करावा त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांच्या जाहिरात प्रसिध्द करून नेमणूका कराव्यात.
२) सदर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी.
३) सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक सर्व कार्यवाहीसाठी मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करत आहे.

सदर "प्रधान मंत्री आवास योजना" (PMAY) हा प्रकल्प राबविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता" यांना "शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत.

**सुहास रकवी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेतील कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्याबाबत मॅडम कायदयामध्ये अशी तरतूद आहे. एखादा कनिष्ठ अभियंता ५ वर्षे इथे सेवा दिल्यानंतर तो ॲटोमेटीकल शाखा अभियंता म्हणून गणला जातो. तर आपल्याकडे खूप दिवस हे पेन्डीग आहे. त्याचप्रमाणे आपल्या इथे ज्यूनियर इजिनियर खूप कमी आहेत आमच्या वॉर्डमध्ये सतिश तांडेल म्हणून ज्यूनियर इंजिनियर म्हणजे प्रत्येक टाईम त्यांना भाईदर ते पश्चिम म्हणजे कधी नगरसेवक संख्या बघितल्यानंतर तर ज्युनियर इंजिनियर संख्या कमीच आहे. तर तुम्ही त्या विषयाबरोबर या ज्युनियर इंजिनियरची संख्या पण वाढवावी अशी मी सुचना देतो या बरोबर त्याचप्रमाणे प्रत्येकाला जो विभाग देतात त्यांना वॉर्ड द्यावे कारण त्या एरियामध्ये आम्ही त्यांच्याशी संपर्क साधू शकतो. गेल्या मिटींगमध्ये आमच्या प्रभाग १ ची मिटींग होती "भारत स्वच्छता अभियान" पंतप्रधानांनी चांगली योजना राबविली त्याच्यामध्ये आम्ही हेच सांगत होतो की आपल्या येथे या मार्केटमध्ये टॉयलेट हा प्रकार नाही. बाजार वसुली आपण करतो. उत्तन किंवा बाहेरची लोक येतात ते कुठेही उघड्यावर करतात. आपण त्यांना सुविधा प्रोव्हाईड केली की मग ते कुठेही करणार नाही. ऑटोमॅटिकली तो स्वच्छ भारत निर्माण होईल. माझ्या वॉर्डमध्ये सुध्दा काही गाळे मी खाली केलेत त्यावर कोणी अनधिकृत पझेशन घेतल होत तर तिकडे तशी व्यवस्था करावी. महिलांसाठी एक वेगळी राखीव ठेवा. मच्छी मार्केटमध्ये तिथे चांगल्या प्रकारच्या लोकांना तशी सूचना द्या आणि बोर्ड लावा की येथे स्वच्छतागृह आहे. महिलांसाठी एक वेगळ करा अशी मी आपल्याला सूचना करतो मॅडम.

**मा. महापौर :-**

आपण कदाचित म्हणूनच सांगते ठराव वाचताना आपण जर शांतता ठेवली तर सगळ ठरावामध्ये आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम तुम्ही ठराव चर्चा झाल्यानंतर वाचला असता तर आम्हाला आनंद झाला असता त्याच कारण असे आहे प्रत्येक सभासदाला आपल्या मतदार संघातली माहिती असते. आता तो ठराव झाला तो त्यांनी एक विशिष्ट त्या विषयाच्या अनुसरुन बनवला आहे.

**मा. महापौर :-**

मी तेच सांगते तुम्हाला हे शहरासाठी किंवा वॉर्डसाठी नाही. स्मार्ट सिटीतली एक जी योजना आपल्याला गरजेची आहे राबविणे त्यासाठी आहे. आणि आपण ओवर ऑल ते केलेले आहे. आपण ते फरकच समजायला रेडी नाहीत. तुम्ही वॉर्ड वाईज सांगतात.

**सुहास रकवी :-**

मॅडम तस नाही वॉर्ड म्हणजेच आपल शहर ना.

**मा. महापौर :-**

माझ्या वॉर्डचा कचरा उचलला नाही. माझ हे झाल नाही, ते विषय नाही ना आता.

**सुहास रकवी :-**

मॅडम, आता आणखी एक सांगतो मध्ये एकदा चर्चा झालेली देशमुख सर त्यामध्ये खूपच अलर्ट असतात. आपल्या येथे प्रवासी लोक येतात. समजा बाहेरुन कोणी आले त्यांना कुठे आपण दाखवू शकतो की हे इथे स्वच्छता प्रसाधन गृह आहे. किंवा डस्टबीन आपण म्हणतो याला टाकायच नाही. पानपट्टे साहेबांनी वारंवार सांगितले की ज्या फेरिवाल्यांकडे प्लास्टीकची पिशवी मिळाली की त्यांचा धंदा बंद करा दंडात्मक कारवाई करा त्यांना फाईन लावा. फेरिवाले सकाळी काय करतात पिशव्या टाकून जातात.

**मा. महापौर :-**

मी आपल्याला परत विनंती करणार तो विषय झाला आहे. तुम्ही ते विषय काढू नका. साहेब जेव्हा ठराव चालू असते, सुचना चालू असते तेव्हा आपण उठून बोलत नाही आणि आता आपल्याला फक्त अभियंता बद्दल बोलायचं आहे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागून असून मिरा भाईंदर नगरपालिकेची "ब" वर्ग मध्ये दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापना होवून नगरपालिकेचे दि.२८/०८/१९९६ रोजी "अ" वर्गामध्ये रुपांतर झालेले आहे. त्यानंतर दि.२८/०२/२००२ पासून "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १७५३७२ व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५२०३८८ तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८०९३७८ असून सद्यस्थितीत अंदाजे ११ लक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण २० कनिष्ठ अभियंते विविध विभागामध्ये कार्यरत असून यापैकी बहुतांश कनिष्ठ अभियंत्यांची सेवा १० ते १२ वर्षाची झालेली आहे. सदरचे कनिष्ठ अभियंते शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या जा.क्र. सी.डी.एस.१५८२/१५८(२१५)/आ(१०), दि.१६/०४/१९८४ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागासाठीच्या जा.क्र. झेडएनजी/ १०७०/प्र.क्र.२६४/११, दि.२६/०४/२००१ अन्वयेच्या निर्णयासह नवी मुंबई महानगरपालिकेप्रमाणे व महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम' याप्रमाणे कनिष्ठ अभियंता या पदावर ५ वर्षे सेवा पूर्ण झालेनंतर शाखा

अभियंता (वर्ग-२) म्हणून श्रेणीवाढ मिळणेस सन २००८ पासून मागणी करित असून त्यांना अद्यापपर्यंत श्रेणीवाढ देण्यात आलेली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या हद्दीचा विचार करता भविष्यामध्ये महानगरपालिकेची हद्द वाढून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी असल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुभवी, कुशल कनिष्ठ अभियंते यांची कुंठिता घालविण्याच्या दृष्टीकोनातून व मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या “सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम” यामधील तरतुदी यांचा विचार करता शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे तसेच महानगरपालिकेसाठीच्या मंजूर “सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियम” प्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना “शाखा अभियंता” (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्यासाठीचा विषय दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेमध्ये आला असता, सदर विषयांचा गोषवारा नसल्यामुळे सदरचा विषय पुढील मा. महासभेमध्ये घेणेबाबत मा. महासभेने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना “शाखा अभियंता” (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, आता जो ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये आमची अशी सुचना आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका जो कायदा आहे १९४९ चा त्याच्या कलम ५१ (४) आणि (५) अन्वये याला शासनाची मान्यता लागते ती आपण कुठेही नमुद केलेले नाही अस मला वाटत आहे तर ते नमुद करुन घ्यावं. शासनाची मान्यता असल्याशिवाय याच्यामध्ये आपल्याला ती पदोन्नती देता येणार नाही.

**शरद पाटील :-**

या ठरावात माझी सूचना आहे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अत्यंत अपूरा तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे. सद्यस्थितीत ५ ते ७ कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची पदे रिक्त असून त्यामधून काही पदे पदोन्नती भरावयाची आहेत. परंतु महानगरपालिका सदर पदे पदोन्नती भरण्यासाठी आवश्यक पात्रता अनुभव असलेले कर्मचारी नसल्याने कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची सर्व रिक्त पदे तातडीने सरळ सेवेने भरण्यात यावी अशी मी सूचना मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, आयुक्त महोदय चांगला विषय आहे. आमच्याकडे काम करणारे कर्मचा-यांना संधी मिळाली पाहिजे. सभागृहाने त्यांना सर्वानुमते संधी प्राप्त करुन देणे असाच ठराव केलेला आहे. त्याच आम्हीही स्वागत करतो. आयुक्त महोदय आपल्याकडे ७ कनिष्ठ अभियंते मानधनावर आपण घेतले होते. हा विषय मुद्दामून काढला कारण “ज” चा प्रस्ताव याच्याआधी या विषयासंदर्भात होता. १ तारखेच्या मिटींगमध्ये. योगायोगाने ती मिटींग ७ वाजता संपली “ज” चे प्रस्ताव प्रलंबित आहेत अजूनही. ते निकाली लावायला पाहिजे. याच ठरावामध्ये तुम्ही ती सूचना नमूद करुन घेतली तर योग्य राहील. ते ७ आपल्याकडे मानधनावर कनिष्ठ अभियंताना आपण कामावर ठेवले होते त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली नाही. सदर ३ महिने त्यांना पगारही नाही. सध्याच्या परिस्थितीत जेव्हा आपल्याकडे पद मंजूर होऊन येतील किंवा आपल्याला पद मंजूर आहेत सरळसेवेने भरती वगैरेची प्रक्रिया संपेपर्यंत तरी त्यांची मुदतवाढ देण्यात यावी. आणि त्यांचा पगार वगैरे जे काही असेल त्या ठिकाणी देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. ठरावामध्ये सभागृहाने ती सूचना तुम्ही नमूद केली तर ते उत्तम राहील. तुम्हाला शासनाला पाठविताना त्याची अडचण होत नसेल तर किंवा हा विषय मी चर्चेमध्ये सभागृहामध्ये आणलेला आहे त्याच्यावरती तुम्ही तुमच्या पध्दतीने निर्णय घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

या पालिकेमध्ये खूप असे कर्मचारी आहेत जे वर्षानुवर्षे पालिकेची सेवा करतात. पर्यायाने शहराची सेवा करतात. आणि म्हणून प्रत्येक कर्मचा-याला त्याच्या ५ वर्षानंतर जी पदोन्नती आहे किंवा दर्जोन्नती आहे ती मिळायला पाहिजे आणि त्या दृष्टीने आपण हा विषय आणला ही चांगली गोष्ट आहे. मी मागच्या वेळी पण बोलले होते आणि आज ही तीच गोष्ट पुन्हा नमुद करते की जस आपण या ५० लोकांवर मेहेर नजर आहात. आपल्या नजरेतून बाकी पण जे लाभार्थी असतील ते सुटू नये. आपण एकाला न्याय देताना बाकीच्यांवर अन्याय होणार नाही. कारण मी सेवाशर्ती वाचल्यात आणि आपण बनवल्यात. त्यात प्रत्येक ५ वर्षानंतर त्या प्रत्येक व्यक्तीला पदोन्नती मिळण्याचा भाग आहे आणि म्हणून बरेचशे लोक असे आहेत जे पदोन्नती पासून वंचित आहे तर याच्यापुढे या ठरावामध्ये नमुद करा की आपण म्हणतात तशी शासनाची परवानगी घ्या. तुम्हाला जे शक्य असेल ते कारण मला या ठरावामध्ये एक सुचना करावीशी वाटते की या पालिकेचा केवळ अभियंताच नाही तर या पालिकेतला प्रत्येक कर्मचारी ज्याची सेवा ५ वर्ष झाली जो पदोन्नतीला ड्यू आहे त्या माणसाला पदोन्नती ही मिळालीच पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठराव यांच्या सूचनेसह मंजूर.

**प्रकरण क्र. ६३ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ''कनिष्ठ अभियंता'' यांना ''शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागून असून मिरा भाईंदर नगरपालिकेची "ब" वर्ग मध्ये दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापना होवून नगरपालिकेचे दि.२८/०८/१९९६ रोजी "अ" वर्गामध्ये रुपांतर झालेले आहे. त्यानंतर दि.२८/०२/२००२ पासून "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १७५३७२ व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५२०३८८ तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८०९३७८ असून सद्यस्थितीत अंदाजे ११ लक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण २० कनिष्ठ अभियंते विविध विभागामध्ये कार्यरत असून यापैकी बहुतांश कनिष्ठ अभियंत्यांची सेवा १० ते १२ वर्षाची झालेली आहे. सदरचे कनिष्ठ अभियंते शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या जा.क्र. सी.डी.एस.१५८२/१५८(२१५)/आ(१०), दि.१६/०४/१९८४ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागासाठीच्या जा.क्र. झेडएनजी/ १०७०/प्र.क्र.२६४/११, दि.२६/०४/२००१ अन्वयेच्या निर्णयासह नवी मुंबई महानगरपालिकेप्रमाणे व महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम' याप्रमाणे कनिष्ठ अभियंता या पदावर ५ वर्षे सेवा पूर्ण झालेनंतर शाखा अभियंता (वर्ग-२) म्हणून श्रेणीवाढ मिळणेस सन २००८ पासून मागणी करित असून त्यांना अद्यापपर्यंत श्रेणीवाढ देण्यात आलेली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या हद्दीचा विचार करता भविष्यामध्ये महानगरपालिकेची हद्द वाढून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी असल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुभवी, कुशल कनिष्ठ अभियंते यांची कुंठिता घालविण्याच्या दृष्टीकोनातून व मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी शासनाने मंजूर केलेल्या "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम" यामधील तरतुदी यांचा विचार करता शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे तसेच महानगरपालिकेसाठीच्या मंजूर "सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियम" प्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्यासाठीचा विषय दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेमध्ये आला असता, सदर विषयांचा गोषवारा नसल्यामुळे सदरचा विषय पुढील मा. महासभेमध्ये घेणेबाबत मा. महासभेने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" (वर्ग-२) या संवर्गात दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक श्री. राकेश शाह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अत्यंत अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे. सद्यस्थितीत ५ ते ७ कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची पदे रिक्त असून त्यामधून काही पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. परंतु महानगरपालिकेकडे सदर पदे पदोन्नतीने भरण्यासाठी आवश्यक पात्रता, अनुभव असलेले कर्मचारी नसल्याने कनिष्ठ अभियंता व इमारत निरिक्षकाची सर्व रिक्त पदे तातडीने सरळसेवेने भरण्यात यावीत.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत ''स्मार्ट सिटी'' व अमृत योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम एकच सूचना घेतली.

**मा. महापौर :-**

शरद भाईची सूचनासह मंजूर. आपण बसून जा ठराव मंजूर झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, तुमच्या ठरावाच्या बाजूने बोलतोय. विषय कसा आहे की आम्ही केलेल्या येथे सूचना ज्या आहेत तुम्हाला तांत्रिक अडचणी जर त्यामध्ये होत असेल शासनाला पाठवण्या संदर्भात तर स्पष्ट त्याचा उल्लेख करा ना सभागृहासमोर अडचण काय आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम याच्यामध्ये जो गोषवारा दिलेला आहे त्याप्रमाणे आम्ही ठराव केलेला आहे. याच्यामध्ये शासनाला पाठवण्याचा वगैरे उल्लेख केलेला नाही. आयुक्तांच्या सहिचा गोषवारा आहे. महापौर मॅडम, आम्ही वाचलेला ठराव बरोबर आहे. त्या पूर्वी ही शासनाने पाठविलेली लोक जी पद नव्हती त्यांना पण पाठविलेली लोकांना आपण इकडे पगार दिलेला आहे. मग आता हे शासनाकडे पाठविण्याची काय गरज आहे.

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम त्यांनी सांगितले आहे १९४९ च्या कलम (४)(५) नुसार तर ते तुम्हाला नोंद करावे लागेल ते शासनाला पाठवावे लागेल. ते तुम्ही नोंद नाही केल लक्षात ठेवा.

**प्रशांत दळवी :-**

आम्हाला नोंद नाहीच करायची ना. आम्ही दर्जोन्नती दिलेली आहे. आयुक्तांच्या सहिचा गोषवारा इकडे सभागृहात आलेला आहे. आम्ही वाचलेला आहे तो ठराव वाचलेला आहे. त्याच्यामध्ये फेर बदल होणार नाही. हा आपण ॲज इट इज ठराव मांडलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही दिलेल्या सूचना तुम्ही मंजूर करत नाही असा आहे का विषय?

**मा. महापौर :-**

हो.

**मा. आयुक्त :-**

महापौर मॅडम, आपल्या महानगरपालिकेमध्ये जे शेपूट जोडण्याची पध्दत आहे ती अगोदर बंद झाली पाहिजे. प्रशासनाला जो गोषवारा दिला आहे त्या गोषवाऱ्याप्रमाणे तुम्हाला जर ठराव मंजूर असेल तर मंजुर केला पाहिजे नामंजूर असेल तर नामंजूर. तो तुमचा अधिकार आहे. परंतु त्याला एक जण ने एक ठिगळ लावायच, दुसऱ्याने एक लावायच, तिसऱ्याने एक लावायच, चौथ्याने एक लावायचे हे बिलकुल बरोबर नाही. म्हणजे शासनाला आम्ही काय पाठवायचं आम्ही गोषवारा एक द्यायचा तुम्ही त्याला ४-४ शब्द जोडायचे ते कस काय पाठवणार आणि आम्ही या सभागृहामध्ये मी आयुक्त या नात्याने आपल्याला बोलतोय की जर खऱ्या अर्थाने या शाखा अभियंत्याचे काम आपल्याला करायचे असेल तर त्याला शासनाची मंजूरी कायद्यामध्ये आवश्यक आहे. आपण तातडीने त्या दिवशी विषय आला होता म्हणून तुम्हाला दिल आणि त्याच्यामध्ये शासनाची परवानगी घेतल्याशिवाय करुच शकत नाही हे मी आपल्याला सभागृहासमोर सांगतो आणि आपण म्हणताय की आम्हाला ते घ्यायच नाही अस नाही चालणार ना.

**प्रशांत दळवी :-**

आयुक्त महोदय, महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो. आपण जे बोलत आहात ते गोषवाऱ्यामध्ये नमूद आहे का?

**मा. आयुक्त :-**

मला हेच म्हणायचे आहे की, गोषवाऱ्याप्रमाणे उल्लेख असेल ना. असच इथुन पुढे आपण ठराव पास करावा. सभागृहाच्यासमोर मी सांगितल की आमच्याकडून तो विचारा आणि सगळ्यात महत्वाचा मुद्दा की आपल्याकडे आकृतीबंध करण्याची प्रक्रिया आमची प्रशासन स्तरावर चालू आहे. आणि या मंथ एन्डपर्यंत आम्ही ती पूर्ण करुन पुढच्या महिन्यामध्ये महासभेकडे येणार आहोत आणि नंतर शासनाकडे सादर करणार आहोत. परंतु शाखा अभियंत्याला आपल्याला लवकरात लवकर पदोन्नती द्यायची असेल तर आपल्याला शासनाची मंजुरी घ्यावी लागेल. अदरवाईज हे काम होणार नाही एकदम स्पष्ट सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आम्ही ठराव केलेला आहे. वाचलेला आहे आपण तो सहमत करावा यांना तो विखंडीत करावयाचा असेल तर त्यांनी शासनाकडे पाठवावा आमच काही म्हणणे नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही केलेल्या निवेदनामध्ये तुम्ही जो शब्द दिला होता गोषवाऱ्याप्रमाणेच कारवाई होईल तुम्ही कसाही ठराव करा साहेब ही मर्दाची जबान तुम्ही राखा आणि खरोखर याचप्रमाणे चालले पाहिजे प्रशासन. धन्यवाद.

**सुरेश खंडेलवाल :-**

काका, अभी सबने सर्व संमती से यह बात किया कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता सब की सहमती से यह विषय बहुत अच्छा आया। और सबने मंजूरी दी। लेकिन विषय ऐसा है की जो ठराव के अंदर कोई गलती से प्रशासन को भेजने मुद्दा नही छोडा गया और कमिशनर साहब ने उसका निवेदन कर दिया तो महापौर मॅडम यदी पूरे सभागृह की यदी यह भावना है की यह विषय होना चाहिए। इसको आगे सबको पदोन्नती मिलनी चाहिए तो इसमें आप लोगो का विरोध क्यों है? की यह जो है ना जैसा गोषवारा आया है उसी तरह होना चाहिए यदी हम सब सेहमत है की कनिशनर साहब ने कहाँ है उसका निवेदन स्विकार करके इसको शासन के पास भेज दिजीए। तो इसमें आप लोगो को दिक्कत क्या है? यदी आप सब लोग इसमें सेहमत है की यहाँ पे जो भी इतने सालो से काम कर रहे है उनको पदोन्नती मिलनी चाहिए। तो इसमें मेरा एकही निवेदन है की कमिशनर साहब ने जो निवेदन किया है जो की इसमें गलती से गोषवारे में नही

आया है तो उसको सम्मीलित करके आप उसको प्रशासन को भेज कर उसक काम को आगे बढाइए। हमारा मतलब ये है करना है तो और नही करना है तो ये सब नौटंकी करने का कोई मतलब नही।

**मा. महापौर :-**

ठराव आता मंजूर झालेला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी खुलासा केलेला आहे. प्रकरण क्र. ६३ महानगरपालिकेच्या आस्थापनेत कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता म्हणून दर्जोन्नतीसह श्रेणीवाढ देण्याबाबत. जस प्रभात ताईंनी पण आपले मनोगत व्यक्त केल त्याप्रमाणे आमच्या सभागृहातील सगळ्यांची भावना तीच आहे. महानगरपालिकेत काम करणारा प्रत्येक व्यक्ती मग तो सफाई कर्मचाऱ्यापासून तर क्लास २ या क्लास वन पर्यंत अधिकारी आहे सर्वांना पदोन्नती मिळाली पाहिजे. ५-५ वर्षांनी मिळाली पाहिजे. या ठिकाणी आयुक्त महोदयांनी सांगितल आहे की जो गोषवारा आहे त्या गोषवाऱ्याप्रमाणेच ठराव केला जाईल. आयुक्त साहेबांची भुमिका ही रास्त आहे गोषवाऱ्याप्रमाणेच झाले पाहिजे. आता जर त्यांना अडचण नसेल तर तुम्हाला विरोध का आहे मला कळतच नाही. आयुक्त महोदय आपण घेतलेली भुमिका ही स्पष्टपणे भुमिका घेतलेली आहे. त्याबद्दल आपल अभिनंदन करावेसे वाटते. महानगरपालिकेच्या प्रशासनाचे काम राज्य शासनाने आपल्याला आयुक्त म्हणून या ठिकाणी पाठविलेले आहे. आपली भुमिका आपण खंबीरपणे मांडलेली आहे. आणि त्या भुमिकेच्या विरोधात जर महासभा ठराव करत असेल तर आपला अधिकार आहे ४५१ संपूर्ण अधिकार आहे आपल्याला.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम मेरा आपसे एकही निवेदन है की विषय बहुत अच्छा है और पुरा सभागृह इसके फेवर में है की जो इतने बरसों से जो इंजिनियर काम कर रहे है उनको पदोन्नती मिलनी चाहिए। लेकिन कुछ कारण से गोषवारा के अंदर यदी यह नमुद करना भुल गए की इसको प्रशासन के पास भेजके ही मंजुरी मिलेगी तो कमिशनर साहब ने जो निवेदन किया है, आपसे निवेदन है उसको रिप्लेस करके करो ना आगे।

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम विषय मंजूर केलेला सगळ्यांना मान्य आहे तो कमिशनरकडे गोषवारा पाठवून द्या. आता तुम्ही त्याप्रमाणे आणि त्याप्रमाणे कमिशनर पाठवतील पुढच.

**आसिफ शेख :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब आपण या ठिकाणी जो खुलासा केला आहे त्यामध्ये आमची सुचना अशी आहे की शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून आपण त्यांना पदोन्नती द्या हरकत नाही. प्यार कीया तो डरना क्या। बिनधास्त यह सब अपने कर्मचारीयों का परिवार है। उनको पदोन्नती मिलनी चाहिए। शासनाच्या मंजुरीच्या अधीन आपण करुन घ्या. आयुक्त साहेबांना आता आम्ही स्पष्टपणे सांगितल की ज्याप्रमाणे गोषवारा असेल त्याप्रमाणे आम्ही काम करु. कोणाच्या दबावाखाली काम करणार नाही. आयुक्तांची भुमिका चांगली आहे. असा डॅशिंग आयुक्त आम्ही बघितला नाही की मा. महासभेत अस स्पष्ट बोलू शकतो.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. महापौर महोदया महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पद कशी निर्माण करायची. आस्थापना कशी बळकट करायची अशी तरतुद आपल्या ॲक्टमध्ये दिली आहे. ॲक्टच्या कलम ५१ (४) आणि ५ मध्ये अत्यंत स्पष्ट स्वरुपात २०११ साली अमेटमेंन्ट झाली आहे आणि या अमेटमेन्ट नुसार जोपर्यंत राज्य शासनाची परवानगी मिळत नाही तोपर्यंत आपल्याला पद निर्माण करता येत नाही. आणि ५१ (५) मध्ये स्पष्टीकरण दिले आहे की पदनिर्माण म्हणजे काय? तर वेतनश्रेणी बदलणे पदाचे नाव बदलणे एखादा विशेष भत्ता मंजूर करणे, महागाई भत्याच्या व्यतिरिक्त जे काही आपण प्रदान करतो त्याला म्हणतात पदनिर्मिती. अशा प्रकारची अमेटमेंट २०११ मध्ये झालेली आहे. आणि त्या अमेंटमेंटच्या अनुषंगाने साहेबांचे म्हणणे आहे की या गोषवाऱ्यामध्ये अनावधानाने ते राहिलेले आहे तर ते इनसर्ट केल तर ते होऊ शकते. अन्यथा ॲज इट इज ते होणार नाही. त्यामुळे सभागृहांना आपल्याला ते करायचे आहे तेव्हा सामुदायिक भावनाने हे करायच आहे तर ते कस होईल या दृष्टीने ठराव झाला तर त्याची आपल्याला पदोन्नती बघायला मिळेल अदरवाईज ते करताच येणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून सदर शहर निवडण्यासाठी स्पर्धात्मक विहीत गुणांक तक्ता (स्कोअर कार्ड) भरून प्रवेश पत्र राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस स्मार्ट सिटी अंतर्गत पाच वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्षी रु.५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभा करावयाचा असून तसेच स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रती वर्ष रु.२०० कोटी इतका निधी खर्च करावयाचा आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी खालील निर्णय घेण्यात येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभारु शकेल यासाठी नियोजन करावे व शासनास सादर करावे.

२) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करू शकेल यासाठी कार्यक्षमतेचा व नियोजनाचा तपशिल तयार करून शासनास सादर करावा.
३) स्मार्ट सिटी अभियानातंर्गत नागरीकांचा सहभाग बाबतचे नियोजन करण्यात यावे.
४) सदर कामासाठी तांत्रिक कक्ष तयार करावा त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांच्या जाहिरात प्रसिध्द करून नेमणूका कराव्यात.
५) सदर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी.
६) सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त ही सभा प्राधिकृत करत आहेत.

सदर स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) हे प्रकल्प राबविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम यामध्ये गुणांक तक्ता प्रशासनाने भरुन दिला आहे. काय आहे तो गुणांक तक्ता?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाला मी माहिती देऊ इच्छितो मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी व अमृत योजना. अटल मिशन फॉर रिझोल्युशन ॲन्ड अर्बन ट्रान्समिशन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत. या विषयामध्ये आपण डिटेल सगळ प्रस्तावनेमध्ये दिले आहे. तरी पण आपण जे स्कोर बोर्डचे बोलता त्याच्यामध्ये गुणांकन हा विषय काय आहे. स्मार्ट सिटी ही योजना आपल्याला थोडक्यात सांगू इच्छितो की, परवा दिल्लीला श्री. मा. पंतप्रधान महोदयांनी तीन योजना एकाच दिवशी डिक्लेर केल्या आहेत. त्याच्यामध्ये संपूर्ण भारतातले मा. महापौर, मा. आयुक्त संबंधित राज्यातले सर्व सेक्रेटरी आणि कन्सन अधिकारी होते त्यांना सर्वांना प्राचारण करण्यात आले होते. जवळपास १५०० लोकांची कॉन्फरन्स होती. ती कॉन्फरन्स दोन दिवस चालली आणि दोन दिवसामध्ये याच्यामध्ये पहिला मुद्दा होता की, स्मार्ट सिटी, दुसरा मुद्दा होता सर्वांसाठी घरे म्हणजे हाऊसिंग फॉर ऑल आणि अमृत योजना. या तीन योजना वेगवेगळ्या आहेत. तर स्मार्ट सिटी मध्ये डिक्लेरेशन अस झाल आहे की म्हणजे स्मार्ट सिटी कोणाला ठरवायचं? हा कोणालाही अधिकार नाही. अधिकार नाही म्हणजे मा. पंतप्रधानांना अधिकार नाही, मा. मुख्यमंत्र्यांना अधिकारी नाही, मा. महापौरांना नाही, मा. महासभेला नाही, आयुक्तांना नाही कोणालाही नाही. त्यामध्ये अस दिलेले आहे की तुमच शहर स्मार्ट आहे हे तुम्ही कस ठरवायचं जे आपण प्रश्न विचारल त्याच उत्तर मी आपल्याला देत आहे. तर आपल्या शहरामध्ये त्यांनी जे मुद्दे दिलेले आहेत ते १५ मुद्दे आहेत त्या १५ मुद्दयांमध्ये मी आपल्याला १-१ मुद्दा वाचून दाखवतो. आणि १६-१७ तारीख लास्ट दिली होती आणि त्यांनी सांगितल होत महासभेचा ठराव आम्हाला नंतर दिला तरी चालेल पण तुमचा प्रपोजल आमच्याकडे दाखल करा. १७ तारखेपर्यंत फक्त ७ कार्पोरेशनचे दाखल झाले त्याच्यामध्ये आपण आहोत. आणि त्यानंतर आता काल परत डेट वाढवली आहे. त्यामध्ये २४ लोकांचे प्रस्ताव सादर झाले आहेत. परंतु हे गुणांकन आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आणि सगळ्या गोष्टींचा विचार केला तर मला अशी खात्री आहे की १०० टक्के आपला सहभाग होईल. हे कशावरुन तर गुणांकनावरुन याच्यामध्ये अस म्हटल आहे की रफली आपल्याला सांगू इच्छितो, समजा तुमचा एक तारखेला पगार होतो. एक तारखेला पगार होतो का? यस तर तुम्हाला १० पैकी १० मार्क जर समज तुमची १०० टक्के पाण्याची वसुली आहे तर १० मार्क. तुमची जर ८० टक्के वसुली असेल तर ८ मार्क. तुमची जर ५० टक्के वसुली असेल तर ५ मार्क. घरपट्टीची वसुली तुमची ७० टक्के आहे तर ७ मार्क. तुमच ऑडिट तीन वर्षाच झाल आहे तुम्हाला १० पैकी १० मार्क. तुमचा एल.बी.टी. १०० टक्के वसुल आहे तर १० मार्क. ९० टक्के वसुल असेल तर ९ मार्क, ८० टक्के असेल तर ८ मार्क. हे १५ गुणांकन दिलेले आहे त्यांनी आपल्याला १-१ वाचून दाखवतो. १) इन्क्रीज इन सॅनिटिरी लॅटरीनस् रुल्ड अंडर द स्वच्छ भारत. मिशन आणि स्वच्छ भारत मिशनबाबत वकील साहेब आपल्या प्रश्नाच उत्तर मी आता देत आहे, की आपल्या शहरामध्ये ओपन डेफीगेशन म्हणजे उघड्यावर टायलेट करणा-या ३० जागा आहेत. पाठिमागे जे सर्वेक्षण झाले आहे त्याप्रमाणे आपल्या रेकॉर्डला ३० ठिकाणे अशी आहेत आपल्या शहरामध्ये जिथे उघड्यावरती टॉयलेट केले जाते. आणि त्या ठिकाणी आपल्याला टॉयलेट बांधायचे आहेत. परंतु आपल्या मागे मी बोललेले होतो सभागृहामध्ये की आपल्याला फॉरेस्ट डिपार्टमेंटची अडचण आहे, रेल्वे डिपार्टमेंटची अडचण आहे, नॅशनल हायवेची ऑथोरीटीची अडचण आहे. सॉल्ट डिपार्टमेंटची अडचण आहे. म्हणजे अनेक केंद्र शासनाची डिपार्टमेंटची अडचण आहे तर हा मुद्दा आम्ही मा. महापौर त्या ठिकाणी होत्या की दोन्ही कॉन्फरन्सला मॅडम होत्या त्या ठिकाणी आम्ही हा मुद्दा मांडला होता. शासनाने केंद्र शासनाला पत्र दिले आणि टॉयलेटच्या बाबतीमध्ये त्यांनी एन.ओ.सी. ची आवश्यकता नाही अस पत्र आपल्याकडे प्राप्त झाले आहे. त्याच्यामुळे ३० ठिकाणी आता जे ठिकाण आहे त्या ठिकाणी टॉलयेट बांधकामासाठी मी आदेश खांबितला दिलेले आहे. आपले जे- जे ठिकाण आहे त्याचा सर्व्हे आपल्याकडे सगळ रेकॉर्ड रेडी आहे आणि लवकरात लवकर त्या ठिकाणी टॉयलेट बांधायच्या बांधकामाला आम्ही सुरुवात करणार आहोत. जर समजा एन.ओ.सी. ची आवश्यकता नसताना अस म्हटल्यावर आपल्यावरती कुणी गुन्हा दाखल करत असेल की सॉल्ट डिपार्टमेंट

किंवा फॉरेस्ट डिपार्टमेंट किंवा अजुन कोणी गुन्हा दाखल करत असेल तर आपण शासनाला ज्या दिवशी गुन्हा दाखल त्यावेळी सांगू त्यांना सर्व डिपार्टमेंटला एन.ओ.सी. ची आवश्यकता नाही. टॉयलेटच्या बांधकामापुरता अस केंद्र शासनाकडून पत्र आलेल सगळ्या डिपार्टमेंअला सर्क्युलर केलेल आहे. त्यामुळे मला वाटत की आता पुढे टॉयलेट बांधकामासाठी आपल्याला तेथे अडचण येणार नाही. पहिला मुद्दा आहे की इन्क्रीज इन सॅनीटरी लॅटरीन रुल्ड अंडर द स्वचछ भारत अभियान यात पाठिमागे जी स्किम आली होती त्यात आपण भरपुर टॉयलेट बांधले आहेत. शासनाच्या डिपार्टमेंटची अडचण आहे ती वगळता बाकी १०० टक्के कारवाई आपण मागे पूर्ण केली आहे. त्याच्यामुळे आपल्याला १० पॉईंट मिळाले आहेत. त्याच्या नंतरचा मुद्दा आहे की ऑपरेबल ऑनलाईन रिव्हनसेस रिड्रेस सिस्टम म्हणजे आपल्याकडे ऑनलाईन जे शासनाने निर्देश दिले होते त्याप्रमाणे ५ पैकी ५ मुद्दे आपल्याला दिले आहेत. जे शासनाने आपल्याला ई-टेंडरींग करणे, त्याच्यानंतर जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र वगैरे यांपैकी ५ पैकी ५ पॉईंट आहेत. आपल्याला मंथली ई-न्यूज लेटर्स याच्यामध्ये ॲटलिस्ट फस्ट ई-न्यूज पब्लिश तर त्याला ५ पैकी ५ पॉईंट. आपल्याला मिळाले आहेत. ई-टेंडरींगचा आपण सगळा वापरत करतो ई-मेल वरती गर्व्हमेंटकडे आपण तक्रारीचे निवारण करतो. त्यांच्याकडून आपल्याला ई-मेल येतो आपण त्यांना पाठवितो. आपले सरकार असा जो एक विषय आहे त्याच्यामध्ये नागरिकांच्या ज्या ई-मेल वरती तक्रारी येतात त्याच उत्तर ई-मेल वरतीच द्यायच आहे असा आम्ही काल एक आदेश पारित केला आहे. ज्या नागरिकांच्या तक्रारी ई-मेल वर येतात त्यांना उत्तर ई-मेल वरती पाठवायचे आहे. शासनाकडे ज्या काही तक्रारी जातात त्या ऑटोमॅटिकली आपण ज्या लोकांच्या तक्रारीचे निवारण केल ते त्यांना तिथे कळणार आहे. त्याच्यानंतर इलेक्ट्रॉनिकली इनेबल प्रोजेक्ट वाईज म्युनिसिपल बजेट एक्सपेन्डिचर इन्फॉमेशन म्हणजे आपण जी बजेटमध्ये तरतूद केली आहे त्याप्रमाणे तुमचा खर्च होतो का किंवा खर्च केलेला आहे का? त्यासाठी ५ पॉईंट आहे तर ते ५ पैकी ५ पॉईंट आपल्याला मिळाले आहेत त्यानंतर पाचवा पॉईंट आहे रिझोल्युशन ऑफ इलेक्टेड सिटी कन्सल्ट म्हणजे जो आज आपण ठराव घेतोय त्याच्यासाठीचे मार्क आपल्याला ते काऊंट आपला ठराव झाल्यानंतर होणार आहे. त्यानंतर टेबल विथ डेटा स्पेसिफिक अजेंडा ॲन्ड नंबर ऑफ पिपल इन अटेन्डन्स इन वार्ड कन्सलटेशन हेल्थ विथ द रेसिडन्स ऑफ द सिटी हा काय मुद्दा आहे?

**दिपक खांबित :-**

प्रत्येक नगरसेवका बरोबर मिटींग वगैरे घेतो तस महानगरपालिकेच्या आपण वॉर्डात जाऊन लोकांशी संपर्क साधायला पाहिजे हे नगरसेवकांच्या थ्रु नाही. आपण डायरेक्ट पण लोकांकडे जायला पाहिजे त्यांचे काय प्रॉब्लेम आहेत ते समजुन घ्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

नगरसेवकांना सांगायला पाहिजे परंतु ज्या दिवशी आपण त्या वॉर्डात जाणार त्यांना कल्पना द्यायची आणि नागरिकांबरोबर फॉरमल मिटींग घ्यायला पाहिजे त्यासाठीचे मार्क आहेत हे. जे आपण घेतलेले नाही पाठिमागे पण यापुढे घेऊ पण त्याच्याने आपले मार्क कमी होतील. त्यानंतर कम्पलसरी पेनॅल्टी फॉर द डिलेज इन सर्विस डिलीवरी. परवाच्या दिवशी आपण जो सेवा हमी कायदा जाहिर केलेला आहे त्याचा आम्ही शासनाकडे गॅझेट पब्लिकेशन करण्यासाठी देखील पाठविले होते त्याच्यामध्ये ७ दिवसाच्या आत तुम्हाला जर एखाद सर्टिफिकेट आहे ते दिले नाही तर आमच्या कर्मचा-याला त्याच्यामध्ये दंडाची प्रोव्हिजन केली आहे तो दंड आम्ही करणार आहोत आणि ते १०० टक्के करावेच लागणार आहे कारण तो कायदाच आलेला आहे तर त्यामुळे त्याच्यासाठी आपल्याला ५ पॉईंट आहे ५ पैकी ५ पॉईंट म्हणजे शासनाने जो काही सेवा हमी कायदा तयार केला त्यांच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. त्याचे ५ पॉईंट आहेत त्याच्यानंतर आठवा आहे कलेक्शन ऑफ इंटरनली जनरेटेड रेव्हेन्यु टॅक्सेस फी चार्जेस ड्युरींग द लास्ट ३ इयर, १२-१३, १३-१४ आणि १४-१५ मध्ये तुमच आतापर्यंत काय कलेक्शन झाल त्या बद्दलचे जे मार्क आहेत तर ते आपल्याला १० पैकी १० मिळालेले आहेत. त्याच्या नंतरचा मुद्दा आहे पेमेंट ऑफ सॅलरी. त्याच्यामध्ये आपल्याला ५ पैकी ५ पॉईंट आहेत. त्याच्यानंतर ऑडिट ऑफ अकाऊंट्स , १२-१३ पर्यंत ऑडिट झाल असेल तर त्याला ५ पैकी ५ आहेत. आपल झालेल आहे. पर्सेंटेज कॉन्ट्रीब्युशन ऑफ टॅक्सेस रिव्हेन्यू फिज ऑफ यूजर चार्जेस रेन्ट ॲन्ड अदर इंटरनल रिव्हेन्यू सोर्सेस याला १० पैकी १० मार्क आहेत. कारण आपण पाठिमागे जी रिफॉर्म मंजुर केलेले आहे म्हणजे ज्या वेळेला जवाहरलाल नेहरु पुनरोत्थान मध्ये अंडर ग्राऊंड ड्रेनेजची स्किम तुम्ही मंजुर केली २००९-१० मध्ये त्यावेळेला जे रिफॉर्म मंजुर केलेत ते नागरिकांना आपण सेवा दिल्यानंतर त्यांच्या कडून जे काही टॅक्स आपण वसूल करतो किंवा करणार आहोत त्याची आपण अंमलबजावणी करत आहोत. म्हणून त्याच्यामध्ये आपल्याला १० पैकी १० मार्क आहेत. त्याच्यानंतर पर्सेंटेज ऑफ एस्टाब्लीशमेंट ॲन्ड मेन्टनन्स कॉस्ट ऑफ वॉटर सप्लाय. तर वॉटर सप्लाय मध्ये आपण ८० टक्के मेन्टनन्स कमिंग फ्रॉम यूजर चार्जेस म्हणजे ८० टक्के ॲन्ड अबव्ह म्हणजे ८० टक्के पेक्षा जास्त जर तुम्हाला तो पैसा नागरिकांकडून मिळत असेल तर आपली या वर्षीची वसुली माझ्या माहितीनुसार पाणीपुरवठ्याची ९५ पॉईंट काही टक्के आहे तर आपण ८० टक्केच्या अबव्ह आहोत. म्हणून १० पैकी १० मार्क्स. त्याच्यानंतर १३ वा मुद्दा आहे. पर्सेंटेज कॉन्ट्रीब्युशन ऑफ इंटरनल रिव्हेन्यू सोर्स सेल्फ जनरेटेड यूजेस ऑफ कॅपीटल वर्क्स ड्यूरिंग द २०१४-१५ याच्यामध्ये २० टक्के अबव्ह कॉन्ट्रीब्युशन फॉर कॅपीटल वर्क त्याच्यामध्ये १० पैकी १० पॉईंट आहेत आपल्याला आणि १४ नंबरचा मुद्दा आहे. सिटी लेवल जवाहरलाल नेहरु रिन्युवल मिशन रिफॉर्म्स. हे रिफॉर्म्स आपण केलेले आहेत. अगोदर त्यामुळे त्याच्यामध्ये आपण १०० टक्के ॲन्ड अबव्ह रिफॉर्म्स अचिव्ड असल्यामुळे आपल्याला १० पैकी १० मार्क मिळाले आहेत. आणि शेवटचा एक मुद्दा आहे की कम्पलीशन ऑफ प्रोजेक्ट्स

सॅक्शन अप टू मार्च २०१२ अंडर जवाहरलाल नेहरु पुनरोत्थान याच्यामध्ये आपल ८० टक्के काम पूर्ण झालेल आहे. ८० टक्के ॲन्ड अबव्ह त्यामुळे सिव्हरेजच काम आपल १०० टक्के झाले असते तर १० मार्क्स मिळाले असते परंतु ते काम पूर्ण झाल नाही. म्हणून आपल्याला ५ मार्क्स मिळाले आहेत असे आपल्याला एकुण ९५ मार्क्स आजच्या तारखेला आहेत. खांबित काल गेले होते त्यांचे म्हणणे आहे की आपण जे दोन मुद्दे आपल्याला वाचून दाखविली की आपण कॉर्नरमध्ये बैठका घेतल्या नाहीत त्यामुळे तिथे काही मार्क्स कमी होतील पण मला अस वाटत की ९० पैकी जास्तच आपण राहू. ९० पेक्षा खाली येणार नाही. अशा पध्दतीने यामध्ये स्कोर बोर्ड आहे. याच सगळ प्रपोजल तयार करुन ॲडव्हान्समध्ये आम्ही आपल्या महानगरपालिकेचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश व्हावा या दृष्टीकोनातून आपण शासनाकडे १५ तारखेला आम्ही हे दाखल केलेले आहे. १७ तारीख लास्ट होती आम्ही १६ ला सकाळी दाखल केले. त्यामुळे सभागृहाला ही विनंती आहे की हा ठराव अत्यंत सुंदर आहे आणि सगळ्यात महत्वाचा मुद्दा त्याच्यामध्ये आपण डिटेल जर वाचले असेल तर आपल्याला थोडक्यात सांगु इच्छितो की महाराष्ट्र आपल्या महानगरपालिकेकडून आम्हाला काय पाहिजे. त्याचा मुद्दा २ नंबर पानावर दिला आहे की याच्यामध्ये संबंधित नागरी संस्थांनी काय करायच? संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधी करिता प्रतिवर्षी कोटी ५० कोटी इतका निधी स्वतःचा हिस्सा म्हणून उभा करु शकेल या बाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षमतेचा व योजनाचा तपशिल म्हणजे आपण जर समजा याच्यामध्ये स्किम अशी आहे २५ टक्के आपला हिस्सा ५० कोटी रु. ५० कोटी रुपये महाराष्ट्र शासन देणार, १०० कोटी रुपये केंद्रशासन देणार आणि याच्यामध्ये अस झालेले आहे की संपूर्ण भारतामध्ये १०० स्मार्ट शहराची निवड केली जाणार आहे. त्यामध्ये आपल्या महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला म्हणजे पॉप्युलेशन वाईज दिले आहे. कमीत कमी एका राज्याला एक शहर दिले आहे. काही राज्याचे पॉप्युलेशन कमी आहे. त्याच्यामुळे शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन एका राज्याला एकतरी मिळावे म्हणून दिले आहे परंतु आपल्या पॉप्युलेशनचा हिसाब केला तर माझ्या माहितीनुसार उत्तर प्रदेश हायस्ट त्यांच्याकडे १३ जागा काही तरी मिळाल्या आहेत. त्याच्यानंतर कनार्टक मध्ये १२ का ११ जागा मिळाल्या आहेत. तमिळनाडू वगैरे हे स्टेट्स ७ जागा ९ जागा अशा आणि महाराष्ट्र राज्याला १० जागा मिळाल्या आहेत. १० म्हणजे आपल्या २६ महानगरपालिका आहेत आणि मला वाटते २६४ नगरपालिका आहेत. या सर्वांमध्ये कॉम्पीटीशन होणार आहे. परंतु नगरपालिका वेगळ्या आणि अमृत अटल योजना जी आहे त्याच्यामध्ये १ लाखापेक्षा जास्त पॉप्युलेशन ज्या शहराच आहे त्या शहरामध्ये ती योजना राबविली जाणार आहे. त्या योजनेमध्ये काय-काय समाविष्ट केले आहे ते पण आम्ही यात दिले आहे. दुसरा एक मुद्दा असा आहे की, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधी करिता प्रतिवर्षी २०० कोटी इतका निधी खर्च करु शकेल याबाबत संबंधित नागरी संस्थेने स्वराज्य संस्थेच्या कार्यकारी क्षमतेचा व नियोजनाचा तपशील द्यायचा जर समजा दरवर्षी शासनाने आपल्याला ५० कोटी रुपये आपण उभे केले. महाराष्ट्र शासन ५० कोटी देणार. केंद्र शासन १०० कोटी देणार म्हणजे एकूण बेरीज झाली २०० कोटी. तुमची ताकद आहे का २०० कोटी तुमच्या शहरामध्ये खर्च करण्याची त्याला पण ठराव द्यायचा आणि पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण ही योजना सुरु झाल्यापासून ५ वर्षामध्ये हजार कोटी रुपये आपल्या महानगरपालिकेला मिळतील आणि हजार कोटीच्या नियोजनाचा आराखडा करुन आपल्याला सगळ काय द्यायच आहे. टप्याटप्याने तुम्ही काय पहिल्या समजा १५-१६, १६-१७ मध्ये काय काम घेणारआहात. १७-१८ मध्ये काय करणार आहात, १८-१९ मध्ये, १९-२० मध्ये, २०-२१ मध्ये काय करणार अस ५ वर्षांच नियोजन करुन आपल्याला हे द्यायच आहे आणि यामध्ये समाविष्ट होण्यासाठी संपूर्ण महानगरपालिकेमध्ये आणि नगरपालिकामध्ये कॉम्पीटीशन लागली आहे. परंतु कॉम्पीटीशन ज्याच रेकॉर्ड चांगल आहे, मी आता जे १५ मुद्दे वाचून दाखवले त्याच्यामध्ये विनाकारण कोणाला मार्क्स पडणार नाही. वसुली तुमची ९० टक्के असेल तरच ९ मार्क्स. कोणाची जर ४० टक्के असेल तर ते म्हणू शकत नाही आमची ९० टक्के वसूली आहे म्हणजे प्रत्येक रेकॉर्ड मागितला आहे. त्यांनी की तुम्ही ९० टक्के वसूली आहे तर पाणीपट्टीचा रेकॉर्ड द्या. समजा ऑडिट झाले आहे १२-१३ चे १०-११ चे आणि १३-१४ चे तर त्याचे ऑडिटचे आम्हाला रेकॉर्ड द्या. सगळ्या गोष्टी समावेश केल्यानंतर शासन दरबारी त्याची स्क्रुटीनी चालू आहे आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव साहेबांकडे पुढच्या आठवड्यामध्ये त्याचे प्रेझेंटेशन आहे मग त्याच्यामधून ती समिती निवड करेल आणि महाराष्ट्र शासन याची शिफारस केंद्र शासनाकडे करेल मग तिथे आपली निवड होईल की नाही हे अंतिम नंतर कळणार आहे. त्या बद्दलचा हा आजचा ठराव आहे.

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम, आताच आपल्या आयुक्त साहेबांनी केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अमृत योजना अशा दोन प्रकल्पाची त्यांनी माहिती दिली. सगळ्या योजनामध्ये गुणांकन पध्दती म्हणजे १० पैकी जर ९ काम झाले असतील तर ९ मार्क्स ८/५ अशी त्यांनी गुणांकन पध्दत सांगितली वसुलीच पण सांगितल सगळ सांगितल परंतु आम्हाला साहेब तुम्हाला एक सांगायच आहे आता आपल्याकडे बसची योजना होती. आता परिवहन हा विषय आलेला आहे. दळणवळण वाहतुकीमध्ये बसचा अजुन ठिकाणा नाही साहेब त्याचप्रमाणे घनकचरेचा आता तुम्ही पेपरला वाचले असेल ७० कोटीचा आपला आता पालिकेला त्वरीत भरायला हरित लवादा मध्ये भरायचे आहे. म्हणजे अशा गोष्टी आपण मला वाटते तिथे तुम्ही दर्शविल्या की नाही कळत नाही पण गुणांकन पध्दतीनुसार जसे २६४ महानगरपालिकेचा समावेश आहे अस तुम्ही म्हणाला त्याच्यामध्ये नगरपालिका, महानगरपालिका जे काय असतील ते त्याचप्रमाणे तिकडे जाऊन तुम्ही आणखी एक विषय

चांगला आणलात की कुठे आपल्याला जर टॉयलेट वगैरे बांधायचे असतील तर केंद्र शासनाची एन.ओ.सी. आवश्यक नाही. सॉल्ट डिपार्टमेंट, वॉटएवर द सेंट्रल गर्व्हमेंटच्या ज्या लॅन्डस् असतील त्याच्यामध्ये त्यांची आवश्यकता नाही.

**मा. आयुक्त :-**

सेंट्रल गर्व्हमेंटने एक आदेश काढला आहे की टॉयलेट बांधकामासाठी त्यांच्या डिपार्टमेंटची एन.ओ.सी. लागणार नाही. ते पेज सर्क्युलेट केलेले आहे.

**सुहास रकवी :**

बरोबर आहे साहेब परंतु आता आम्ही तुम्हाला अस विचारु इच्छितो की, आपण टॉयलेट वगैरे बांधणार आहात तर सेंट्रलच्या जागा इथे जवळपास नाही. आपण लोकांना स्मार्ट सिटी म्हणजे बाजार इथे आणि टॉयलेट तिथे तस डिस्टन्स तर पाहिजे. आपण कुठे बांधणार त्याची माहिति तर आम्हाला मिळाली पाहिजे. ती माहिति सुध्दा साहेब तुमच्या माध्यमातून मिळाली पाहिजे. कारण इकडची लोक बाजार इथे घेणार आणि तेवढ्या लांब टॉयलेटला जाणार नाही. तर ती माहिति तुम्ही द्यायची त्यानंतर साहेबांनी म्हटल्याप्रमाणे ३० असे आपल्याकडे स्पॉट आहेत की शहरात उघड्यावर करतात. तर ते कुठल्या-कुठल्या ठिकाणी आपल्याला कस प्लान म्हणजे नियोजनबध्द करता येईल त्याची सुध्दा तुम्ही आम्हाला माहिति दिली तर बर होईल. त्यानंतर तुम्ही आता ते मेलचे म्हणालात, आता जस आमच्या इथे सभापती साहेब आहेत त्यांनी सांगितल वाय-फाय सिस्टम करायचे शहरामध्ये स्थायी समितीत झालेल. मेलमध्ये कम्पलेंट करा, मेलमध्ये तुमच्या कम्पलेंटचे आनसर, तक्रारीचे निवारण किंवा तुम्ही मेलद्वारे करा. त्याही सुध्दा चांगल्या योजना आहेत पण त्या ॲक्टीवेट झाल्या पाहिजे. त्यानंतर तुम्ही म्हणाला की, स्मार्ट सिटीमध्ये आपली रिकव्हरी झाली आहे. साहेब आपली रिकव्हरी जस त्यांनी सांगितल ओपन लॅन्ड टॅक्स त्या ओपन लॅन्ड टॅक्सची आपण वारंवार त्या स्थायी समितीमध्ये टॅक्स डिपार्टमेंट त्याच्यानंतर नगररचना विभाग यांचा समन्वय नाही. कारण सी.सी. टू ओ.सी. याच्यामधला जो गॅप आहे त्याच्यानंतर मी अमाऊंट येते. पेपर मध्ये ४१ कोटी यायची, ५२ कोटी यायची तर त्या संदर्भात सुध्दा साहेब तो एक विषय आहे ज्या आपल्या वसुलीच्या थकबाकी राहिल्या असतील त्या पहिल्या करा आपली स्मार्ट सिटी झालीच पाहिजे तुम्ही आता एवढे गुणांकन ९५ टक्के मिळाले असे तुम्ही म्हणालात. ५ टक्के राहिले पर्सन टू पर्सन म्हणजे जे वोटर्स असतात किंवा ते नागरिक असतात त्यांना तुम्ही प्रत्यक्ष भेट देणारच आहात आणि त्या माध्यमातून तुम्ही आम्हाला सुध्दा एक मध्यस्थी किंवा आमच्या माध्यमातून आम्हाला आवश्यकता काय आहे कारण अधिकारी जातील नागरिक म्हणतील ते येऊन गेले आणि आम्हाला काही कळणार नाही या गोष्टी या स्मार्ट सिटी होण्याकरिता आवश्यक आहे. चांगली योजना आहे आम्ही खरोखर त्याच स्वागत करतोय या मिरा भाईंदरमध्ये तुमच्या सारखे अधिकारी आयुक्त म्हणून आले आणि त्यांनी स्मार्ट सिटी योजना करण्याचा प्रयत्न केला पण तो पूर्णत्वास आणि तडीस देण्याकरिता आमचे सुध्दा सहकार्य असेल आम्ही सुध्दा तुम्हाला सहकार्य करु. पण त्याचबरोबर त्याची माहिति वारंवार आणि नियोजनबध्द झाली पाहिजे अशी माझी सूचना आहे. आपण दोन शब्द बोलायला दिल्याबद्दल मी धन्यवाद मानते.

**मदन उदित नारायण सिंह :-**

महापौर की परवानगीसे बोल रहा हूँ, आयुक्त साहेब पहले तो मैं आपको धन्यवाद देता हूँ। पहले प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी को धन्यवाद देते है, उनके आभारी है वो भारत के प्रधानमंत्री बने और उनके मन में स्मार्ट सिटी, स्मार्ट गाव और स्मार्ट गल्ली का विचार आया। और उस विचार को देखते हुए हमारे आयुक्त ने जो प्रयास किया की स्मार्ट सिटी का दर्जा हमको मिले। हम लोग सोच रहे थे की मिरा भाईंदर उसमें हो, आ पाएगा की नही लेकिन आयुक्त साहबने जो प्रयत्न किया और ऐसा लगता है की हमे मिल जाएगा उसके लिए मैं आयुक्त की टिम को धन्यवाद देता हूँ। एक बात मैं और कहना चाहूँगा आयुक्त साहेब महापौर मॅडम हमारे आमदार साहब सबको में धन्यवाद देता हूँ। लेकिन उसके साथ एक बात और कहना चाहूँगा जो १५ क्रायटेरिया आपने बताया उसमें अगर कही हम कम है तो शासन और प्रशासन के माध्यम से उसको हम और भी अच्छा करने की कोशिश करे या होनी चाहिए। सर मैं आपको पुछ रहा हूँ यह जो राईट टू सर्विस लोकसेवा हमी कायदा का जी.आर. आया है अपने पास आ गया है क्या?

**मा. उपायुक्त (मु.):-**

जो जी.आर. भी आ गया है, अपने नेट पी है और सर्क्युलेट भी किया है।

**मदन उदित नारायण सिंह :-**

लेकिन हम लोगो को सर्क्युलेट नही किया गया।

**मा. उपायुक्त (मु.):-**

वर्तमान पत्र में भी प्रसिध्द किया है।

**मा. महापौर :-**

मदनजी आप विषय को लेके बोलिए।

**मदन उदित नारायण सिंह :-**

महापौर मॅडम वही विषय है और विषय से हटके भी है तो शहर के फायदे के लिए है। तो हम लोगो को नगरसेवकको को यह सर्क्युलेट नही किया गया।

**मा. उपायुक्त (मु.):-**

वर्तमान पत्र में प्रसिध्द किया है।

**मदन उदित नारायण सिंह :-**

ठिक है जैसे हर जी.आर. हमको दिया जाता है तो यहाँ पर क्यों नही दिया गया?

**मा. उपायुक्त (मु.):-**

आपको भी दे देंगे।

**मदन उदित नारायण सिंह :-**

मेरा यह कहना है आयुक्त साहब, जी.आर. हम लोगो को दिया जाए और इसकी जानकारी पुरे जनता को दि जाए।

**मा. आयुक्त :-**

जेव्हा आम्ही कायद्याचा जे शासनाकडून आदेश आला तो पेपरमध्ये प्रसिध्द केला आहे. आपण दैनिक पेपर किंवा साप्ताहिक पेपरमध्ये सगळीकडे आम्ही प्रसिध्द केलेले आहे. आणि शासनाकडे गॅझेट पब्लिकेशन करण्यासाठी पाठवले गॅझेट प्रसिध्द होऊन आल्यानंतर सर्व सन्मा. नगरसेवकांना एक कॉपी त्याची देण्यात येईल.

**मदन उदित नारायण सिंह :-**

नगरसेवकांना देण्यात यावी. त्याच्या बरोबरच साहेब आपल्या जनतेलाही हे माहिती झाली पाहिजे. मेरा कहने का मतलब है की इसका इम्प्लीमेंटेशन होना चाहिए। खाली पेपर पे नही रहे यह भी कोशिश करनी चाहिए। धन्यवाद.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम, आयुक्तांच आणि प्रशासनाच हा जो स्मार्ट सिटी प्रकल्प आणि अमृत योजना बाबत अंमलबजावणी करण्यासाठी जे काही शासनाने मागितलेले विषय आहेत ते घाईघाईने आणि कमी वेळेत करुन दिल्याबद्दल त्यांचे मी आभार व्यक्त करतो. आणि माझी पण अपेक्षा अशीच आहे की स्मार्ट सिटीसाठी आपल्याकडून, शासनाकडून केंद्रशासनाकडून निधी उपलब्ध व्हावा त्यामध्ये एक विषय असा आहे ५० करोड रु. आपल्याला दरवर्षी त्यासाठी स्पेंड करायचे आहे. माझ्या मते ३५० करोड रुपये रेव्हन्यू ओवर ऑल आपल आहे. आणि ३५० करोड रु. रेव्हन्यू मधून ५० कोटी रुपये आपण कसे स्पेअर करणार आहोत ती पण एक मोठी टास्क आहे. आणि माझ्यामते त्यावरती आपण जास्त लक्ष दिले पाहिजे, दुसरे यामध्ये आपण काही गोष्टी दिलेल्या सेवा हमी कायद्याबद्दल मदन सिंगजी ने सांगितले तुम्ही प्रसिध्दी केली. प्रसिध्दी अगर आमच्या मार्फत केली असती तर जास्त बर झाल असतं. कारण आम्ही तळागाळाला जाऊन काम करणारी लोक आहोत आम्हाला पण दिल असत तर आम्ही पण आमच्या ऑफिसमध्ये आमच्या लोकापर्यंत ते स्वतःच्या खर्चाने ते वाटली असती जी.आर. आणि सांगितल असत जा प्रशासनाकडे.

**मा. आयुक्त :-**

प्रशासकीय बाब आहे नगरसेवकांचे काम नाही. आम्हाला गॅझेटची कॉपी आल्यावर घरपोच पाठवू आपल्याकडे. ते आपल्या वॉर्डात वाटून जनतेला जागृत करा. गॅझेट पब्लिकेशन झाल्यानंतर देऊ ना अजून ते पब्लिकेशन झालेले नाही.

**प्रमोद सामंत :-**

महानगरपालिकेचा ऑडिट रिपोर्ट ११-१२ चा ऑडिट रिपोर्ट स्टॅन्डिंग समोर सादर झालेला आहे. १२-१३ चा ऑडिट रिपोर्ट अजून स्टॅन्डिंग समोर सादर झालेला नाही. ९-१०, १०-११ आणि ११-१२ या तिन्ही ऑडिट रिपोर्ट वरती स्टॅन्डिंगने माझ्या मते आतापर्यंत कुठलाही निर्णय केलेला नाही. पेंडींग आहे आणि अस असताना सुध्दा तुम्ही सांगितल की १२-१३ चा रिपोर्ट आपण सबमिट केला आहे. माझ्या मते हे गुण आपण प्रशासनाने स्वतः लिहिलेले आहे की आम्ही हे केल. आमच्याकडून या गोष्टी झाल्या असच असाव.

**मा. उपआयुक्त (मु):-**

मा. महापौर महोदय हे गुणांकन म्हणजे पहिल्यांदा स्टेट लेवलची कमिटी त्यानंतर सेंट्रलची कमिटी आणि यामध्ये जे पूढे प्रोजेक्ट करायचे आहेत तर याची प्रायोरिटी गर्व्हमेंटला ठरवण्यासाठी आपण आपले सेल्फ गुणांकन द्यायचे मग गर्व्हमेंट पहिल्या टप्प्यामध्ये सिलेक्ट करणार आपण स्वतःहुनच जर म्हटल की आमच काम झालेल नाही. आम्हाला यात शुन्यात शुन्य आहे. आपल सिलेक्शन व्हायचं प्रश्नच येत नाही. आपल त्यात सिलेक्शन व्हाव म्हणून तुमच आणि आमच यामध्ये एकमत असल पाहिजे. आता राहिला प्रश्न काम किती झाल किंवा कस होणार तर ते डी.पी.आर पुढे डिटेल होणार आहे. त्यांना प्रत्येक प्राजेक्ट आपल्याला इम्पलीमेंट करुन दाखववे लागणार आहे.

**प्रमोद सामंत :-**

दुसरी महत्वाची गोष्ट आपण स्वच्छ भारत मिशनवर एक आता ठराव पण केला स्वच्छतेचा संकल्प आणि आता याच्यात पण जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत आपण अस माझ्या मते त्यांना सांगितल की ९० टक्के आपण काम केलेले आहे. त्या दिवशी वाकोडे साहेबांनी पण सांगितल की ९० टक्के काम केलेले आहे मला माहित नाही ही टक्केवारी त्यांची कशी ठरते. पैसे दिल्यावरुन ठरते की त्यांना पेमेंट दिल्याप्रमाणे ठरते की काम केल्याप्रमाणे ठरते हे काही माझ्या लक्षात आलेले नाही. मिरा भाईंदर मधला एकही एस.टी.पी. प्लान्ट अजून १०० टक्के क्षमतेने चालू नाही. पण आम्ही लिहितो की आमचे ९० टक्के काम झालेले आहे आणि ९०

टक्के पेमेंट सुध्दा झालेले आहे. बी.एस.यु.पी. योजना सुध्दा . जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत झाली कोणालाही घरे मिळाली नाहीत ज्या लोकांना आपण शिफ्टींग दिल ना १७-१७ माळ्यावरती त्यांना शिफ्टींग दिले आहे आणि त्या इमारतीची लिफ्ट सुध्दा चालू नाही. तिकडची व्यवस्था बघायला महानगरपालिकेच्या प्रशासनाचा एकही माणुस तिथे नाही आणि आम्ही म्हणतो जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत ९० टक्के काम झालेल आहे. ९० टक्के पेमेंट झालेल आहे. आमच्या इकडचे एस.टी.पी. अर्धवट चालू आहे रोज पाणी ट्रिटमेंट केल्याशिवाय गटारामध्ये सोडतोय. पर्यावरण खात्याचे काय निर्देश आहेत की नाहीत आपल्याला. त्या निर्देशावरती कुठली लक्ष दिल जात नाही आणि राजरोस पणे अख्ख पाणी पूर्ण ते सांडपाणी आणि आता आपण त्या गटारात सोडतोय आणि आता नविन कनेक्शन जोडणी करायला घेतली आहे. २५-२५ हजार रुपये लोकांकडून आपण त्याची फिज मागतोय. लोक फिज पण भरतात. मग आता ती नविन जोडणी करुन सुध्दा ते पाणी तसच सोडणार आहे का? पप्पु पास झाला पाहिजे पुन्हा एकदा सांगतो आम्हाला पण वाटत पण अशा सेल्फ डिक्लेरेशन करताना एल.बी.टी. पण सेल्फ डिक्लेरड आहे. फाईन लावतो इंटरेस्ट लावतो बरोबर ना. नागरिकांना आणखी त्रास देतो. आपल्या ऑडिटरला पाठवून १० तास बसायला लावतो ऑफिसमध्ये मग हा जो गुणांकन तक्ता भरला आहे तो पण फॅक्ट गोष्टीवर भरुन द्यावा आमचा कुठलाही आक्षेप नाही परत सांगतो पण या सगळ्या गोष्टी पूर्ण तपासणी करुन भराव्यात अशी माझी इच्छा आहे. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आजचा विषय चांगला आहे. पंतप्रधान मोदी साहेबांनी आणलेल्या योजना स्मार्ट सिटी आणि आताचे नवोनित कमिशनर यांनी आणला आणि त्यांनी स्पष्टीकरण करुन दाखवले. मला यात हे सांगायच आहे की स्मार्ट सिटी म्हणजे काय? ऑलरेडी आम्ही स्मार्ट सिटी बनविली आहे. आमचा मिरा भाईंदर शहर अतिशय सुंदर बनविला आहे बाकी काय राहिलेले ते सांगा. योजना आहे ते कळल मला वाचन केल मी. मला एकच म्हणायच की, या स्मार्ट सिटीमध्ये मिरा भाईंदर शहराचे जेवढे लॉज आणि बार आहेत ते बंद करा तरच स्मार्ट सिटी होईल. हा मुद्दा माझा समाविष्ट करुन घ्यावा अशी माझी विनंती आहे आपल्याला, महापौरांना आणि मोदी साहेबांना सुध्दा सांगते. तुम्ही तरच म्हणेल या मिरा भाईंदर शहराचा विकास झाला आणि स्मार्ट सिटी झाली. किती बार आहेत परवाच्या दिवशी एका पत्रकाराचा मर्डर झाला. ते जर इललिगल बार बंद करा ही माझी सूचना समाविष्ट करा.

**प्रकरण क्र. ६४**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्रशासन पुरस्कृत "स्मार्ट सिटी" व अमृत योजना प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत.

**ठराव क्र. ३७ :-**

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून सदर शहर निवडण्यासाठी स्पर्धात्मक विहीत गुणांक तक्ता (स्कोअर कार्ड) भरून प्रवेश पत्र राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस स्मार्ट सिटी अंतर्गत पाच वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्षी रु.५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभा करावयाचा असून तसेच स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रती वर्ष रु.२०० कोटी इतका निधी खर्च करावयाचा आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी खालील निर्णय घेण्यात येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभारु शकेल यासाठी नियोजन करावे व शासनास सादर करावे.
२) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करू शकेल यासाठी कार्यक्षमतेचा व नियोजनाचा तपशिल तयार करून शासनास सादर करावा.
३) स्मार्ट सिटी अभियानातंर्गत नागरीकांचा सहभाग बाबतचे नियोजन करण्यात यावे.
४) सदर कामासाठी तांत्रिक कक्ष तयार करावा त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांच्या जाहिरात प्रसिध्द करून नेमणूका कराव्यात.
५) सदर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी.
६) सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त ही सभा प्राधिकृत करत आहेत.

सदर स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) हे प्रकल्प राबविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील          अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, सार्वजनिक रस्त्यांवर (फुटपाथ / फुटवेज) समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे काणेतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत व सदरचे धोरण मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्वेधर्मीय उत्सव सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये पोलिस कार्यालयाच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळी ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर येत उभारण्यात असलेल्या मंडप संदर्भात व ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात डॉ. महेश बेडेकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१० सोबत सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. १२४/२०१४ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ व दि. २४/०६/२०१५ रोजीच्या आदेशात समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडपसंदर्भात सविस्तर विवेचन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये महानगरपालिकांच्या आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरीता महानगरपालिकांनी धोरण तयार करुन मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहेत. सदरचे धोरण सर्व समाजांच्या व धर्माच्या उत्सवांना लागू राहतील व सदर धोरणास महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द देणेबाबत व सदरची धोरण प्रतिज्ञापत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात विहीत कालावधीत सादर करणेस आदेशित केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/नवि३४, या शासन निर्णयाद्वारे सर्व महानगरपालिकांना मा. उच्च न्यायालयाने दि.१३/३/२०१५ व दि.२४/०६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करावे व यासंदर्भात विहित कालावधीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात व शासनास सादर करण्यास निर्देशित केलेले आहे. तसेच दि.१५/०७/२०१५ रोजी या विषयासंदर्भात मा. सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे झालेल्या बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सर्व महानगरपालिकांना सदरचे धोरण निश्चित करण्याकरीता मा. महासभेची मंजूरी घेणेस आदेशित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरता उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे २०१५ तयार केली असून सोबत जोडलेल्या धोरणास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

**सुनिला शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६५**

सार्वजनिक रस्त्यांवर (फुटपाथ / फुटवेज) समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे काणेतेही अन्य बांधकाम तात्पुरते उभारण्यास परवानगी देण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत व सदरचे धोरण मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत.

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्वेधर्मीय उत्सव सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था महानगरपालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये पोलिस कार्यालयाच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळी ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर येत उभारण्यात असलेल्या मंडप संदर्भात व ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात डॉ. महेश बेडेकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१० सोबत सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. १२४/२०१४ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ व दि.

२४/०६/२०१५ रोजीच्या आदेशात समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडपसंदर्भात सविस्तर विवेचन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये महानगरपालिकांच्या आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरीता महानगरपालिकांनी धोरण तयार करुन मार्गदर्शक सुचनांच्या स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहेत. सदरचे धोरण सर्व समाजांच्या व धर्माच्या उत्सवांना लागू राहतील व सदर धोरणास महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द देणेबाबत व सदरची धोरण प्रतिज्ञापत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात विहीत कालावधीत सादर करणेस आदेशित केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन परिपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/नवि३४, या शासन निर्णयाद्वारे सर्व महानगरपालिकांना मा. उच्च न्यायालयाने दि.१३/३/२०१५ व दि.२४/०६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करावे व यासंदर्भात विहित कालावधीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात व शासनास सादर करण्यास निर्देशित केलेले आहे. तसेच दि.१५/०७/२०१५ रोजी या विषयासंदर्भात मा. सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे झालेल्या बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सर्व महानगरपालिकांना सदरचे धोरण निश्चित करण्याकरीता मा. महासभेची मंजूरी घेणेस आदेशित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पुरता उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे २०१५ तयार केली असून सोबत जोडलेल्या धोरणास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील                अनुमोदन :- श्रीम. सुनिला शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस आहे त्यांचे अभिनंदन हे सभागृह करत आहे.

**डॉ. आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे महाराष्ट्र विधान सभेतील आमचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार साहेब यांचाही आज वाढदिवस आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही वाढदिवस आहे. या दोघांनाही महासभा मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या उज्वल भविष्यासाठी चांगल्या कार्यर्किदीसाठी शुभेच्छा व्यक्त करत आहेत.

**अनिल भोसले :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो. विषयाला सोडून बोलतो जरीमरी तलाव या ठिकाणी जुनी असलेली भिंत कोसळून त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे तो एक विषय आहे दुसरा कमिशनर साहेब लोढा कॉम्पलेक्स मध्ये, रात्री मी आपल्याला फोन केला होता का पाण्याच्या टाकीमध्ये शौचालयाचे पाणी मिक्स झालेले आहे. साफसफाई झाली आहे. साहेब लोढा कॉम्पलेक्स चे जे बिल्डर, इंजिनियर आहेत आणि आपले इंजिनियर बांधकाम इलेक्ट्रीसिटी यांना सगळ्यांना एकत्रित बैठक घेतल्याशिवाय हा प्रश्न मिटणार नाही तर आपणाला माझी विनंती आहे की आजच्या आज लोढा कॉम्पलेक्सचे इंजिनियर आणि आपले इंजिनियर यांची बैठक करुन ती सिस्टम समजून घ्यावी कारण ते पाण्याच्या आतमध्ये असल्यामुळे पंपिंग जे आहे ......................

**मा. आयुक्त :-**

सभा संपल्यावर आपली तातडीने बैठक लावण्यात येईल.

**भगवती शर्मा :-**

मेरा एकही कहना है आपको आज इस सभागृह के अंदर में जनताके कक्षमें काफी लोग बैठे है पत्रकार कक्ष के अंदर एकभी पत्रकार नही है। मुझे ऐसी सुचना मिली है की उन्होंने आज इस महासभा का निषेध किया है। और निचे कुछ अपनी मांगो को लेकर मोर्चे में बैठे है। मेरा आपसे निवेदन है की उनकी क्या मागणी है।

**वंदना चक्रे :-**

आमची पण मागणी आहे की इललिगल हॉटेल व्हाईट हाऊस हे तोडण्याचे तुम्ही २४ तासात तोडतो म्हणून सुचविले होते ते अजुन तोडलेले नाही ही मागणी पूर्ण करा आणि आता पत्रकार आपली वाट बघतात त्यांना जाऊन आपण लवकर भेटा.

**रोहिदास पाटील :-**

या मिरा भाईंदर शहराला लाच्छनास्पद असलेल्या या शहरातील पत्रकार कै. राघवेंद्र दुबे यांची हत्या झालेली आहे. त्यांच्या कुटुंबावर मोठा आझात झाला आहे. त्याच्याबद्दल ही सभा दुःख व्यक्त करते, भावना व्यक्त करते. त्यांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे त्यांच्यावर हमला करणाऱ्यांना योग्य ती शिक्षा झाली पाहिजे अशी आपल्या सभागृहातील सगळ्यांची भावना आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्याही कुटुंबावर आघात झाला आहे. तसेच महाराष्ट्राचे भुषण स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांच्या मातोश्री यांचेही निधन झाले आहे. त्या बद्दल ही सभा शोक व्यक्त करते.

**सुहास रकवी :-**

भाईंदर मधील पत्रकार दुबे यांची हत्या झाली त्याबद्दल कॉंग्रेस पक्षातर्फे आम्ही शोकसभा मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

त्याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने दुबे यांना श्रध्दांजली अर्पण करते.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईदर सप्ताहिकाचे संपादक राघवेद्रंजी दुबे यांची निघृणपणे हत्या झाली तरी शिवसेना पक्षातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या शहरातील नागरिक ते पुण्याला जाताना जी दरड कोसळली त्यामध्ये त्यांचे निधन झाले त्याबद्दल ही सभा दुःख व्यक्त करते.

**दुःखवटा ठराव क्र. ३९ :-**

या शहरातील पत्रकार कै. राघवेंद्र दुबे यांची हत्या झालेली आहे. त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. त्याच्याबद्दल ही सभा दुःख व्यक्त करते, तसेच महाराष्ट्राचे भुषण स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांच्या मातोश्री यांचेही निधन झाले आहे. त्या बद्दल ही सभा शोक व्यक्त करते. तसेच आपल्या शहरातील नागरिक ते पुण्याला जाताना जी दरड कोसळली त्यामध्ये त्यांचे निधन झाले त्याबद्दल ही सभा दुःख व्यक्त करते.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्रीम. वंदना चक्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

दोन मिनिट जागेवर उभे राहून श्रध्दांजली वाहायची आहे.

**(सभा संपल्याची वेळ दु. १.०० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

